साप्रति/गट-८(रवका)/न.क्र.३५१/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा
मुंबई - ४०००१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र.४२१ दिनांक २१/५/२००४

**विषय** : मंडळाच्या पूर्वानुमतीशिवाय प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, कर्मचा-याने व्यापार, व्यवसाय, धंदा यात गुंतवून घेणे किंवा सक्षम अधिका-याला पूर्व कल्पना न देता त्याच्या कुटुंबातील व्यक्तींने, व्यापार, व्यवसाय किंवा धंदा करणे बाबत.

म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवा विनियम क्र.८५ (ध)(१) अनुसार मंडळाच्या पूर्वानुमतीशिवाय कोणत्याही कर्मचा-याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही व्यापार, व्यवसाय किंवा धंदा यामध्ये स्वतःला गुंतविता येत नाही. तसेच सेवाविनियम क्र.८५(ध)(२) अनुसार प्रत्येक कर्मचा-याने त्याच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती, एखादा व्यापार किंवा धंदा करीत असेल किंवा त्या व्यक्तीच्या नावावर विम्याचा किंवा दलालीचा व्यवसाय असेल किंवा ती व्यक्ती स्वतः तो व्यवसाय करीत असेल तर, सक्षम अधिका-याला तसे कळविणे आवश्यक आहे.

२. तथापि, मंडळाचे काही अधिकारी/कर्मचारी यांनी वाहने खरेदी करुन सदर वाहने सक्षम अधिका-यांची पूर्वमंजुरी न घेता मंडळाकडे भाडे तत्वावर कंत्राटी पध्दतीने लावली आहेत अशी माहिती मिळाली आहे. तसेच असेही निदर्शनास आणून देण्यात आले आहे की काही कर्मचा-यांच्या/अधिका-यांच्या मुलांनी किंवा कुटुंबातील अन्य व्यक्तींनी वाहने खरेदी करुन सदर वाहने मंडळाकडे भाडे तत्वावर कंत्राटी पध्दतीने लावली आहेत. शिवाय काही कर्मचा-यांची मुले किंवा कुटुंबातील अन्य व्यक्ती रोहित्र दुरुस्तीचा (Transformer Repairs Workshop) किंवा रोहित्राचे तेल शुध्द करण्याचा (Filteration of Oil) व्यवसाय करीत आहेत किंवा त्यांच्या व्यवसाय संस्था (Firms) आहेत. त्यांनी अशा कामासाठी मंडळाकडून कंत्राट देखील मिळविले आहे अशीही माहिती मिळाली आहे. याबाबत कर्मचा-यातर्फे मंडळाच्या सक्षम अधिका-यास तसे लेखी कळविण्यात आलेले नाही.

३. वरील बाब म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवाविनियम क्र.८५ (ध) (१) आणि ८५ (ध) (२) मधील विनियमांचा भंग करणारी आहे. सबब, अशी प्रकरणे हाताळण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात येत आहे.

अ) मंडळाच्या कर्मचा-यांच्या/अधिका-यांच्या मालकीचे वाहन मंडळाकडे किंवा इतरत्र कुठेही भाडे तत्वावर कंत्राटी पध्दतीने लावावयाचे झाल्यास अथवा इतर कोणताही व्यवसाय करावयाचा असल्यास कर्मचा-याने/अधिका-याने सेवाविनियम ८५(ध)(१) अधिन मंडळाच्या सक्षम अधिका-याची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

ब) मंडळाच्या कर्मचा-यांच्या/अधिका-यांच्या कुटुंबातील एखादी व्यक्ती वाहन खरेदी करुन मंडळाकडे भाडे तत्वावर कंत्राटी पध्दतीने देऊन व्यापार किंवा धंदा करु इच्छित असल्यास संबंधित कर्मचारी/अधिकारी यांनी सेवाविनियम ८५(ध)(२) अधिन सक्षम अधिका-याला याबाबत आगाऊ लेखी कळविणे आवश्यक आहे. अशा सूचनेची (Intimation) प्रत दक्षता व सुरक्षा संचालनालयास व अपर संचालक (शिस्तभंग नियंत्रण कक्ष) यांना देखील अग्रेषित करणे आवश्यक राहील.

क) दरपत्रक/निविदा मंजूर करणाने अधिकार असलेल्या सक्षम अधिका-याच्या कुटुंबातील व्यक्तीने दरपत्रक/निविदा भरली असल्यास, असे दरपत्रक/निविदा मंजूरीचे प्रस्ताव लगतच्या वरिष्ठ अधिका-यास सादर करावीत. उदा.एखाद्या मुख्य अभियंत्याच्या नातेवाईकाने त्यांच्या कार्यालयात निविदा भरली असेल व ते निविदा मंजूर करण्यास सक्षम अधिकारी असतील तर त्यांनी सदर निविदा मंजुरीसाठी तांत्रिक संचालक यांचेकडे पाठवावी. लगतच्या वरिष्ठ अधिका-याने दरपत्रक/निविदा यांचा तुलनात्मक तक्ता काटेकोरपणे, गुणात्मकदृष्ट्या व निपक्षपातीपणे तपासावा व सक्षम अधिका-याच्या कुटुंबातील व्यक्तीची निविदा गुणात्मक निकषावर मंजूर करता येत असल्यास त्याबाबत आदेश द्यावेत.

४. रोहित्र दुरुस्ती आणि रोहित्राचे तेल शुध्द करणे किंवा मंडळाशी इतर व्यापार, व्यवसाय किंवा धंदा करणे या बाबींसाठी देखील वरील 'अ' 'ब' व 'क' अनुसार कार्यवाही होणे आवश्यक राहील.

५. स्थावर/जंगम मालमत्तेचे विवरणपत्र सादर करण्याच्या संदर्भात परिपत्रक क्र.सापवि/ माविकक्ष/ मा.वि./६१९५ दि.२७ नोव्हेंबर १९९१ मध्ये नमूद केलेली कुटुंब सदस्याची व्याख्या माहितीसाठी खाली अनुवादीत केली आहे. सदर व्याख्येनुसार स्थावर/जंगम मालमत्तेचे विवरण सादर करण्याच्या प्रयोजनास्तव कुटुंबाचा सदस्य या व्याख्येत खालील घटक समाविष्ट असतील :

क) कर्मचा-याबरोबर राहणारी किंवा न राहणारी पत्नी किंवा पती प्रकरणपरत्वे. तथापि, सक्षम न्यायालयाच्या डिक्री अन्वये/हुकुमान्वये विभक्त झालेल्या पत्नीचा किंवा पतीचा 'कुटुंबाचा सदस्य' या व्याख्येत समावेश होणार नाही.

ख) संपूर्णत: कर्मचा-यावर अवलंबून असलेला मुलगा किंवा मुलगी किंवा सावत्र मुलगा किंवा सावत्र मुलगी. परंतु पुरुष किंवा स्त्री कर्मचा-यावर कोणत्याही प्रकारे अवलंबून नसलेले मूल किंवा सावत्र मूल किंवा कोणत्याही कायद्यान्वये ज्याचा ताबा पुरुष किंवा स्त्री कर्मचा-याकडे राहिलेला नाही असे मूल या व्याख्येनुसार 'कुटुंबाचा सदस्य' मानला जाणार नाही.

ग) स्त्री किंवा पुरुष कर्मचा-यावर प्रकरणपरत्वे पूर्णपणे अवलंबून असलेली आणि रक्तसंबंधामुळे किंवा विवाहामुळे त्याच्या/तिच्या नात्यात आलेली व्यक्ती.

६. कुटुंबातील व्यक्तीच्या संदर्भात वरील व्याख्या लागू राहील.

७. उपरोक्त सुचनांचे मंडळाच्या सर्व कर्मचारी/अधिकारी यांनी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. अन्यथा म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवाविनियमांच्या 'वर्तणूक शिस्त व अपील विनियम' यातील तरतुदींनुसार संबंधित कर्मचारी/अधिकारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरेल याची नोंद घ्यावी.

(संजय भाटिया)
सचिव

प्रत सादर :
मा.अध्यक्ष आणि सर्व मंडळ सदस्य, म.रा.वि.मंडळ, मुंबई.

प्रत,
प्रेषण यादीनुसार.

GAD/Gr.VIII(O&M)/F.No.351
Maharashtra State Electricity Board
Estrella Batteries Expansion Bldg.
Ground floor, Dharavi Road
Matunga, Mumbai – 400 019.

## ***ADMINISTRATIVE CIRCULAR NO. 422 DATE 10/06/2004***

Sub : Communication of adverse remarks and overall grading of the Confidential Reports – Representation thereof ...

---

As per the instructions contained in Administrative Circular No.327 dated 22nd September 1999, the overall grading falling in the category of "Average", "Below Average" and "Poor" recorded in the Annual Confidential Reports of employees from the year 1999-2000 onwards is to be communicated to the concerned so that the employees will not remain ignorant about the overall grading recorded in their Annual Confidential Reports and will get an opportunity to improve their performance and make efforts to remedy defects and shortcomings.

2. Similarly the overall grading of "Good" is also to be communicated to all employees in Pay Gr.I for the reasons that the rating of "Good" is not sufficient for 'Selection Post'.

3. The issue regarding communicating the adverse remarks recorded in the Annual Confidential Report of all employees in Pay Group I, II, III and IV and entertaining representations against communication of the overall grading "Good" to the employees in Pay Gr.I was examined a fresh and the following instructions are issued for guidance and immediate implementation :-

(1) The overall grading such as "Poor", "Below Average", "Average", recorded in the Annual Confidential Reports shall be conveyed to the concerned to enable them to improve their performance and make efforts to remedy defects.

(2) Representation against communication of overall grading such as "Poor", "Below Average" and "Average" shall only be entertained in future.

P. T. O.

(3) Also, with a view to know their performance by each employee, it has been decided to communicate overall grading as "Good", "Very Good" and "Outstanding" to the individual employees from the reporting year 2003-04. However, no representations for revising/upgrading the overall grading shall be entertained.

This Circular is issued with the approval of the Chairman.

***( S.Y. Patil )***
***Director of Personnel***

To

All as per mailing list.

*md:Adm.Cir.FN-351*
*10/6/04*

GAD/Gr.VIII(O&M)/F.No.351
Maharashtra State Electricity Board
Estrella Batteries Expansion Building
Ground floor, Plot No.1; Dharavi Road
Matunga, Mumbai – 400 019.

**_ADMINISTRATIVE CIRCULAR NO.423 DATE 23/06/2004_**

Sub : Setting up of Legal Cell at Zonal Office.

By Head Office letter No.Legal/Court Case/3334 dt.2nd June, 1999, each Office was directed to maintain a register in the prescribed proforma, in order to have requisite information available regarding litigations for and against the Board in various Courts in Maharashtra State.

2. It has been observed that the said registers are not being maintained properly and promptly at all levels. All the concerned are therefore, directed to maintain such registers regularly and the information therein shall be filled in properly. The said register shall be produced for inspection as and when called by A.P.O./E.O. or by any Officer authorised by Law Officer/Secretary.

3. It has been decided to establish Legal Cell for monitoring Court litigations at every Zonal level. The Estt.Officer of the Zone shall be in-charge of the said Legal Cell. The duty list as regards in-charge of Legal Cell i.e. E.O. at Zonal level is annexed herewith as Annexure – 'A'.

4. All the A.P.Os. and Officers maintaining the registers as above, shall send the monthly information regarding the cases filed and disposed of during the month to Estt.Officer. The Estt.Officer shall consolidate the said information and send it to the Law Officer in the prescribed proforma as is being sent.

5. A.P.Os. and the concerned Head of the Department of Accounts & Technical Wing/C.I.R.O./Dy.C.I.R.O. shall co-ordinate with the E.O. and shall ensure that the Officer concerned with the litigation gives proper instructions to the Advocate for filing reply affidavit, giving evidence in the Court etc..

6. The Estt.Officer and the concerned Officers shall give personal attention to see as to why money decrees passed by the Courts are not being executed promptly.

7. The Chief Engineer In-charge of the Zone shall ensure that all sort of help to the Establishment Officer/Dy.Estt.Officer for setting up and proper and effective functioning of Legal Cell.

8. The Law Officer/Dy.Law Officer shall periodically take stock of the pending cases at different levels and shall ensure effective and proper working of Legal Cells.

Encl. : Annexure 'A'

*(Sanjay Bhatia)*
*Secretary*

To

1) All Head of the Departments in H.O. & field
2) All Supdtg.Engineers in H.O. & field
3) All Ex.Engineers & equivalent Officers in field.

*Md;Adm.Cr.-Legal Cell*
*23/6/04*

ANNEXURE – 'A'

## Duties assigned to Officer in-charge of Legal Cell at Zonal level

1. The E.O. shall be In-charge of Legal Cell at Zonal level.

2. He shall ensure that all the Offices under his Zone are maintaining Registers as per letter issued by Law Officer bearing No.Legal/Court Case/3334 dt.2nd June, 1999.

3. He shall periodically check such Registers either himself or through A.P.Os.

4. He shall maintain upto date information as regards various cases filed at the Zonal level and shall obtain monthly information regarding the cases filed and disposed of at different levels within the jurisdictions of his Zone.

5. The monthly information shall be sent to the Law Officer in the prescribed proforma pertaining to the cases filed and disposed of during the month.

6. The Registers maintained at the Zonal level shall be made available for inspection whenever asked by the Law Officer.

7. The Estt.Officer shall co-ordinate with the concerned Officers from Technical Wing and Accounts Section, so as to collect the information promptly and to have co-ordination between Advocates and concerned Officer with the litigation.

8. The Estt.Officer shall ensure that the cases are properly distributed to the Panel Advocates only.

9. He shall further ensure that the professional fees of the Advocate is paid promptly and properly.

10. He shall scrupulously follow the instructions and the Circulars that may be issued from time to time by the Law Officer.

11. He shall personally take stock of the money decrees passed by different Courts in Board's favour and shall take efforts to find out as to why decrees are not being executed.

12. He shall be directly responsible for the working of Legal Cell to the Law Officer & Secretary.

---

क्र.साप्रवि/मावक/विमाप्र/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत ,प्लॉट नं.१,
तळमजला ,धारावी रोड, माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.
दिनांक : ३० जुलै २००४

प्रशासकीय परिपत्रक क्रमांक.४२४

विषय:-अनुसुचित जमातीच्या राखीव जागांवर दि.१५ जून १९९५ पूर्वीचे सरळसेवेने नियुक्त अथवा पदोन्नत झालेल्या विशेष मागास प्रवर्गातील कर्मचारी/अधिकारी यांची शासकीय /निमशासकीय सेवेतील ज्येष्ठता निश्चित करण्याबाबत

संदर्भ :- १) प्रशासकीय परिपत्रक क्र.१४९ दि.१२/१४-९-१९९५.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.१५८ दि. १-११-१९९५.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.१७७ दि. १-३-१९९६.
४) प्रशासकीय परिपत्रक क्र.१९८ दि. १४-११-१९९६.
५) प्रशासकीय परिपत्रक क्र.२८६ दि. ३०-९-१९९८.
६) प्रशासकीय परिपत्रक क्र.४०८ दि. १७-१-२००४.

-------

विशेष मागास प्रवर्गातील ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी दिनांक १५ जून १९९५ पूर्वीच अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत प्रवेश मिळविला असेल अथवा पदोन्नती प्राप्त केलेली असेल अशा अधिका-याना/कर्मचा-यांना सेवेतून काढून टाकण्यात येऊ नये किंवा पदावनत करण्यात येऊ नये असे आदेश शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६ब, दिनांक १५ जून १९९५ व शासन शुध्दीपत्र क्रमांक , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०९४/प्रक्र-६८/९४/१६ब , दिनांक २४ जुलै १९९८ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत (मंडळाचे प्रशासकीय परिपत्रक क्र. १५८ दि.१-११-१९९५ व क्रमांक २८६ दि.३०-९-१९९८ कृपया पहावे).

उपरोक्त दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयाद्वारे संरक्षण देवून अशा संरक्षित केलेल्या अधिकारी/कर्मचा-याची सेवा जेष्ठता दिनांक १५ जून १९९५ अशी विचारात घेण्यात यावी असे आता शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२००४/प्र.क्र.४५/०४/१६ब, दिनांक २४ जून २००४ अन्वये ठरविण्यात आले आहे.

मंडळ ठराव क्र.१४८६ दिनांक १८-६-१९८५ (वर्गीकरण व सेवा प्रवेश विनियमाच्या सुधारपत्र क्रमांक १७२ दिनांक २३-७-१९८५) व प्रशासकीय परिपत्रक क्रमांक २८९ दिनांक २०-१०-१९९८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार मा.सचिव यांनी मा.लेखा सदस्य,मा.तांत्रिक सदस्य [निर्मिती] व तांत्रिक सदस्य ]पा व .वि] यांच्याशी विचारविनियम करुन उपरोक्त शासन निर्णय स्वीकृत करण्यास मंजूरी दिली आहे.

तरी सर्व, नियुक्ती अधिका-यांनी उपरोक्त शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही विनाविलंब करावी असे मा.सचिव यांनी आदेश दिलेले आहेत. सोबत सदर शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.

सोबत: शासन निर्णय दि. २४-६-२००४ ची प्रत.

संचालक (कर्मचारीवर्ग)

प्रति,
कार्यकारी अभियंता यांचे स्तरापर्यंत प्रेषण यादीनुसार.

C:\Narvekar\My Documents\BCR.doc

अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दिनांक १५ जून, १९९५पूर्वीच सरळ सेवेने नियुक्त अथवा पदोन्नत झालेल्या विशेष मागास प्रवर्गातील कर्मचारी / अधिकारी यांची शासकीय /निमशासकीय सेवेतील जेष्ठता निश्चित करण्याबाबत

LABOUR ... Serial No. 2013 ... 30-8-2006

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी - २००४/प्र.क्र.४५/०४/१६-ब

मंत्रालय , मुंबई -४०० ०३२

**दिनांक : २४ जून , २००४**

**पहा** .- १) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक : बीसीसी -१०९४/ प्र.क्र ६८/९४/१६ब, दिनांक १५ जून १९९५

२)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक : बीसीसी -१०९४/ प्र.क्र ६८/९४/१६ब, दिनांक २४ जुलै, १९९८

३)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक : बीसीसी -१०९४/ प्र.क्र ६८/९४/१६ब, दिनांक २७ मे २००२.

**प्रस्तावना :-** अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये ज्या जमातींचा समावेश करण्यात आलेला आहे अशा जमातीच्या नावाशी साधर्म्य असणा-या गोवारी,माना,कोष्टी,कोळी, मुन्नेरवार,या सारख्या जातींचा **विशेष मागास प्रवर्ग** म्हणून समाज कल्याण ,सांस्कृतिक कार्य ,क्रिडा विभाग, यांनी त्यांच्या क्रमांक -सीबीसी -१४९४/प्र.क्र.२३६/मावक -५, दिनांक ७ डिसेंबर १९९४ च्या शासन निर्णयान्वये घोषित केलेला आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक- बीसीसी १०९४/प्र.क्र. ६८/९४/१६ब, दिनांक १५ जून १९९५ अन्वये विशेष मागास प्रवर्गासाठी सरळ सेवा व पदोन्नतीमध्ये २% आरक्षण विहीत करण्यात आले आहे. तसेच या विशेष मागास प्रवर्गातील ज्या व्यक्तींना दिनांक १५ जून १९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय / निमशासकीय सेवेत प्रवेश मिळवून पदोन्नती प्राप्त केलेली आहे त्यांना पदावनत किंवा सेवेतून काढून टाकण्यात येवू नये अशा प्रकारचे संरक्षण दि.१५ जून १९९५ च्या शासन निर्णयान्वये दिलेले आहेत.

दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयानुसार विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना सेवेतील संरक्षण देण्याबाबत वरील प्रमाणे निर्णय घेतला असला तरी असे संरक्षण प्राप्त केलेल्या कर्मचारी अधिकारी यांना त्यांच्या संरक्षित केलेल्या संवर्गातील ज्येष्ठता कशा प्रकारे विचारात घ्यावी याबाबत

निर्णय घेण्यात आलेला नव्हता. या अनुषंगाने श्री.एस.ए.कंदिकटला विरुध्द महाराष्ट्र शासन प्रकरणी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण , मुंबई यांच्यासमोर दाखल झालेल्या मूळ अर्ज क्रमांक ३९८/२००१ प्रकरणी, दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयात ज्या व्यक्तींना सेवेतील संरक्षणाचा फायदा देण्यात आलेला आहे तो फायदा त्या संवर्गातील त्यांची जेष्ठता संरक्षित करण्यासाठीही आहे असे स्पष्टपणे नमूद करणारे आदेश निर्गमित करण्याबाबत न्यायाधिकरणाने निर्णय दिलेला आहे. न्यायाधिकरणाचे आदेश विचारात घेवून दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयानुसार सेवेत संरक्षण प्राप्त केलेल्या विशेष मागास प्रवर्गातील अधिकारी / कर्मचा-यांची सेवा जेष्ठता निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या अनुषंगाने शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

विशेष मागास प्रवर्गातील ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी दिनांक १५ जून १९९५ पूर्वीच अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय / निमशासकीय सेवेत प्रवेश मिळविला असेल अथवा पदोन्नती प्राप्त केलेली असेल अशा अधिकारी / कर्मचा-यांना उपरोक्त क्रमांक १ येथील दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयाद्वारे संरक्षण देवून अशा संरक्षित केलेल्या अधिकारी/ कर्मचा-यांची सेवा ज्येष्ठता **दिनांक १५ जून १९९५** अशी विचारात घेण्यात यावी.

२. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या वरील आदेश निदर्शनास आणून निर्णयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना विनाविलंब देण्यात याव्यात

३. हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा , मंडळे / महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा अनुदानित शैक्षणिक संस्था , सहकारी संस्था, शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम इत्यादी कार्यालयांना लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( यु.पी.एस.मदान )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

GAD/Gr.VIII(O&M)/F.No.895
Maharashtra State Electricity Board,
Estrella Batteries Expansion Bldg.,
Ground floor, Plot No.1,
Dharavi Road, Matunga,
Mumbai-400 019.

## ADMINISTRATIVE CIRCULAR NO.425 DATE 07-08-2004.

Sub: Training scheme for non-qualified dependents under the scheme of compassionate appointment (under C.S.28 dt.16.4.75 to G.S.O.112). - Clarification of queries.

Read: General Order No.159(Personnel) dt.20-06-04.

.............

Subsequent to issue of General Order No.159(Personnel) dt.30.6.04 regarding implementation of training scheme for non-qualified eligible dependents for employment under the compassionate appointment scheme, some queries were raised by the field officers. The queries raised are clarified as under.

| Sr. No. | Query | | Clarification |
|---|---|---|---|
| 1) | Wherever there is more than one ITI Center within the geographical jurisdiction of the Zone, then where the candidates are to be deputed for the training ? | - | It has already been mentioned in para-11 of G.O.159(P) dt.30.6.04 that a batch of 25 candidates taking into account the place of residence of the dependents should be prepared and deputed to any of the nearest ITI indicated in the Annexure-'A'. The issue has been further discussed with the Director, Vocational Training & Education and he has agreed to accept variation of 5 candidates either on higher or lower side. |
| 2) | Whether candidates can be deputed to the ITI Center which is not included in the list but convenient to the candidates? | - | The issue was discussed with the Director of Vocational Training and Education. He has no objection to depute the candidates to the ITI Center which is not included in our list provided the batch consists of minimum 25 candidates. The Principal of such ITI may be contacted and requested to conduct the batch if the Centre is convenient to all the candidates. |
| 3) | Whether the age limit mentioned in the G.O. is relaxable ? | - | The upper age limit provided under para-1 of the G.O. is 33 years. Such of the candidates who were within this age limit on the date of application for employment under the scheme of compassionate appointment are to be considered eligible and deputed for the training. |

| | | |
|---|---|---|
| 4) | Whether dependents of deceased employees who are eligible for employment but are not in receipt of MMB are to be deputed for the ITI training or otherwise? | - The candidates who are eligible to get employment under C.S.28 but they could not get employment and because of not getting employment they are eligible for MMB (even though it is not sanctioned so far) should be considered for the training scheme. |
| 5) | Can a female dependents also be sent for ITI training? | - Yes. There is no bar for deputing female dependents for training if she is otherwise eligible for employment under C.S.28 and fulfill the condition stipulated in G.O.159(P) dt.30.6.04. |
| 6) | Whether the candidates are eligible for TA/DA during the training period? | - No. Since the candidates are not employees of the Board, they are not eligible for any TA/DA during the training period. |
| 7) | Whether the non-qualified dependents on the chronology list of Power Stations are to be deputed even though there is no scope for absorption as Line Helper under Power Stn. | - This point has already been clarified vide letter No.1625 dt.14.7.04. The names of eligible dependents are to be furnished to the C.E. of T&D Zone under whose geographical jurisdiction Power Station is located. |
| 8) | Whether all eligible BC candidates are to be considered for training even though there is no backlog for their absorption after completion of training? | - Yes. The position has already been clarified in para-13 of the G.O. In case some candidates could not be accommodated due to non-availability of backlog in the Zone, such candidates will be given posting in another Zone where there is a backlog of BC. |
| 9) | Whether the dependents whose cases are referred to H.O. for condonation or approval in case of voluntary retirement on medical ground/invalidation are to be covered under the training scheme. | - No. Such cases required detailed examination at H.O. Therefore, such cases should not be covered unless approved by the Competent Authority in Head Office. |
| 10) | Whether training cost per candidate is Rs.6,600/- or Rs.5000/- and how the payment is to be effected. | - The Board has approved training cost of Rs.6600/- per candidate. However, subsequently negotiations were done and cost has been reduced to Rs.5000/- per candidate. This is to be paid in advance to the concerned ITI. The consolidate payment of batch should be effected by the Zonal Office after ascertaining reporting of the candidates for training. |
| 11) | Whether dependent possessing higher qualification can be considered for training, if he gives consent. | - This has already been clarified in para-6(9) of G.O.159(P) dt.30.6.04. |

P.T.O.

2. In case of any doubt regarding payment of fees, change of ITI Centre or variation in the batch, the Regional Deputy Director of Vocational Training and Education may be contacted. An additional list of ITI Centres furnished by the Director, Vocational Training and Education is also enclosed herewith.

3. This Circular is issued with the approval of the Secretary.

Encls: As above.

(S.Y.PATIL) 7/8/04.
Director of Personnel

To:
All as per mailing list upto the level of
E.E. equivalent and above in H.O. and field.

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नांवे

### मुंबई विभाग

१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंबई - ११.
२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ठाणे.
३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल, जि. रायगड
४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी
५) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सिंधुदुर्ग

### पुणे विभाग

६) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुणे
७) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सातारा
८) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सांगली
९) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर
१०) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर

### नाशिक विभाग

११) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नाशिक
१२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धुळे
१३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नंदूरबार
१४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जळगांव
१५) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अहमदनगर

### औरंगाबाद विभाग

१६) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद
१७) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना
१८) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परभणी
१९) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हिंगोली
२०) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बीड
२१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदेड
२२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लातूर
२३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उस्मानाबाद

## अमरावती विभाग

२४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमरावती
२५) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अकोला
२६) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वाशिम
२७) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुलडाणा
२८) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, यवतमाळ

## नागपूर विभाग

२९) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर
३०) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर
३१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गडचिरोली
३२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भंडारा
३३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गोंदिया
३४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वर्धा

GAD/Gr.VIII-(O&M)/F.No.545-A/
Maharashtra State Electricity Board
Estrella Batteries Expansion Bldg.
Ground floor, Dharavi Road
Matunga, Mumbai – 400 019.

## *ADMINISTRATIVE CIRCULAR NO.426 DATE 07/08/2004*

**Sub** : Erroneous continuation of employees beyond the date of Superannuation.

Read : Adm.Circular No.376 dated 2/1/2003.

---

The instructions were issued under Adm.Circular No.376 dated 2/1/2003 that all the Establishment Sections in H.O. and field should maintain a calendar of superannuation-retirement and ensure timely retirement of the employees on their attaining the age of superannuation. It was also directed that the Head of Establishment Section shall be responsible for continuation of any employees beyond the date of superannuation and disciplinary action for dereliction of duties shall be taken against responsible officers. A copy of the Judgement of the Supreme Court in the case of Radha Kishum v/s Union of India & others appeared in All India Services Law Journal VI-1997(2) was circulated alongwith the aforesaid Adm. Circular. In the reported case, there was no dispute in the recorded date of birth but the employee was continued by mistake beyond the date of superannuation.

2. Consequent on issue of the above Adm. Circular, queries were raised as to whether the payment of salary beyond the date of superannuation is to be recovered from the employee either through CPF, Gratuity or Leave Encashment payment due/payable to him at the time of retirement. The issue has been examined and it has been considered that it is not fair to recover the payment of salary of the period for which the employee has actually worked even though he might have continued beyond the date of superannuation for whatsoever reason. The work of any person is required to be remunerated.

3. In view of the above, following instructions are issued :-

(i) The final settlement of CPF, Gratuity, Leave Encashment etc. should be done considering the correct date of birth.

(ii) Board's Contribution towards CPF should not be allowed beyond the correct date of superannuation.

(iii) Recovery of salary paid beyond the date of superannuation should not be made.

(iv) The interest on CPF contribution including the contribution deducted through the salary beyond date of superannuation shall be paid till the date of final settlement as per normal practice.

(v) The responsibility should be fixed on the concerned Head of Establishment Section for continuation of an employee beyond date of superannuation and disciplinary action should be taken for dereliction of duty.

4. A Special Drive should be launched for verification of dates of birth of all the employees and it should be ensured that the dates of birth in respect of all employees are verified before 31/10/2004. A certificate should be obtained from the Head of Establishment Section of the Division, Circle, Zone and Sectional Heads of Establishment Groups in Head Office that the dates of birth of all employees working in the Division/Estt.Groups have been verified. On the basis of certificate obtained from the Head of Establishment Section of Division/Circle/Zone, the Estt.Officer/ Dy.Estt.Officer/Incharge of GAD in Zone Office should submit a certificate to the Head Office by 5/11/2004 certifying that the dates of birth in respect of all employees working under Zone have been verified. The similar certificate should be given by the A.D.(Estt.)/J.S.(Tech.) in Head Office for the employees working in Head Office.

5. The above instructions should be followed scrupulously and it should be ensured that the dates of birth in respect of all employees are verified by 31/10/2004 under this Special Drive.

6. This Circular is issued with the approval of the Chairman.

(*S. Y. Patil*)
***Director of Personnel***

To
All as per mailing list upto the level of Ex.Engr. in H.O. and field.

*Mp:Adm.Cir. FN-545A*

क्र. साप्रवि/गट-८(स्वका)/न.क्र.८५३/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, प्लॉट नं. १,
तळमजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई-४०० ०१९.**

**<u>प्रशासकीय परिपत्रक क्र. ४२७ दिनांक ९.८.२००४</u>**

विषय :- शाखा कार्यालये व तक्रार निवारण केंद्र सकाळी ८ वाजता उघडण्याबाबत.

------

असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की मंडळाची काही शाखा कार्यालये दुपारी १२ वाजेपर्यंत उघडली जात नाहीत, तसेच काही कार्यालये दोनदोन दिवस उघडली जात नाहीत. त्यामुळे ग्राहकांना त्यांची तक्रार/गा-हाणे/अर्ज शाखा कार्यालयास सादर करता येत नाही व पर्यायाने त्यांच्या तक्रारींचे निवारण वेळीच होऊ शकत नाही. म्हणून कांही वेळेस तक्रारीचे निवारण करुन घेण्यासाठी ग्राहकांना, मंडळाचे वरिष्ठ अधिकारी किंवा लोकप्रतिनिधीकडे धाव घ्यावी लागते. परिणामी मंडळाची जनमानसातील प्रतिमा मलीन होते.

२. उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता आता अशा सूचना देण्यात येत आहेत की मंडळाची शाखा कार्यालये/तक्रार निवारण केंद्र ही सकाळी ८ वाजता उघडली जावीत व ग्राहकांच्या आलेल्या तक्रारी/अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात यावी व अर्जाची/तक्रारींची गांभिर्याने दखल घेऊन, तक्रारींचे वेळीच निवारण होईल याची काळजी घ्यावी.

३. वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व त्यात कुचराई आढळल्यास संबंधिताविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

(संजय भाटीया)
**सचिव**

प्रत प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना

F.N.370-SKW

साप्रवि/गट-८(खका)/न.क्र.८४६
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला,धारावी रोड,माटुंगा
मुंबई - ४०००१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र.४२८ दि.९/८/२००४

विषय : अपंग व्यक्ती (समान संधी,हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) नियम २००१ - शासनाची अधिसूचना.

वाचा : १) स.सा.स्था.आ.क्र.११२ दि.१२.२.६२ चे सु.प.क्र.२६७ दि.१४.९.१९९९
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.३८० दि.१०.२.२००३
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.४०७ दि.८.१.२००४

......

"अपंग व्यक्ती (समान संधी,हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५" आणि "अपंग व्यक्ती (समान संधी,हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) नियम २००१," अनुक्रमे स.सा.स्था.आदेश क्र.११२ दि.१२.२.६२ चे सु.प.क्र.२६७ दि.१४.९.१९९९ आणि प्रशासकीय परिपत्रक क्र.४०७ दि.८.१.२००४ अन्वये मंडळाच्या संबंधीत कार्यालयांनी करावयाच्या कार्यवाहीसाठी प्रसृत करण्यात आले आहेत.

२. आता शासनाने परिपत्रक क्र.अपंग/१००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ दि.६.५.२००४ अन्वये काही महत्वाच्या सूचना निर्गमित केल्या आहेत, जसे की

१) अपंग व्यक्तींसाठी ठेवावयाच्या आरक्षणाबाबतच्या मार्गदर्शनात्मक सूचना.
२) अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणानुसार पदांची परिगणना करण्यासंबंधीच्या सूचना.
३) अपंगांसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा अनुशेष भरण्यासंबंधीच्या सूचना इत्यादी.

३. शासनाचे परिपत्रक दि.६.५.२००४ ची प्रत माहितीसाठी, मार्गदर्शनासाठी आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की त्यांनी उपरोक्त परिपत्रकातील सूचना लक्षात घ्याव्या आणि त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

४. सदर परिपत्रक सचिवांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

( पु.य.पाटील )
संचालक (कर्मचारीवर्ग)

प्रत,
कार्यकारी अभियंता, तत्सम व त्यावरील दर्जाचे अधिकारी यांना प्रेषण यादीप्रमाणे.

K/Hendi-4

A. D. (P) 61/130
Date 27/06/2004

**अपंग व्यक्तींसाठी आरक्षण ठेवण्याबाबत आरक्षणानुसार पदे भरण्याबाबत कार्यपद्धती**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. अपंग-२००३/ प्रक्र.१२७/ २००३/१६-अ
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ६/५/२००४.

Sectt. 139
Date 27/5/04

वाचा :- १) केंद्र शासनाचा अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५

२) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.१२/९७/१६-अ, दि. २ मे, १९९८

३) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ, दि.४ मार्च, २००२.

प्रस्तावना :

केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ मधील तरतूद क्र.३२ अनुसार शासकीय आस्थापनेमध्ये अपंग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवता येऊ शकतील अशी पदे ठरवावयाची असून तरतूद क्र.३३ अनुसार अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग किंवा मेंदुचा पक्षघात या अपंग प्रवर्गासाठी प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण तीन टक्के आरक्षण ठेवून अशा व्यक्तींच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत. तथापि एखाद्या विभागातील /आस्थापनेतील कामाचे स्वरुप विचारात घेऊन व यासंबंधात कारणे स्पष्ट करून आरक्षण ठेवण्यापासून सूट देण्याबाबत आदेश निर्गमित करावयाचे आहेत. या तरतुदी विचारात घेऊन राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाने विभागांतर्गत व विभागांच्या अधिपत्याखालील गट अ, ब, क व ड मधील सर्व संवर्गातील कामाच्या स्वरुपाचा आढावा घेऊन अपंग व्यक्तींसाठी ३% आरक्षण ठेवण्याबाबत प्रस्ताव तयार करून, त्यास समाजकल्याण विभाग व सामान्य प्रशासन विभाग यांच्या मार्फत शासनाची मान्यता घेऊन शासन निर्णय निर्गमित करण्याच्या सूचना उपरोल्लेखित क्र.२ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या होत्या. उपरोल्लेखित क्र.३ च्या परिपत्रकान्वये आरक्षणानुसार नियुक्त्या करण्याबाबत क्रमवार बिंदु व कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.

अपंगांसाठी संवर्गानुसार आरक्षण ठेवण्याच्या व प्रत्येक पदासाठी १०० बिंदुची स्वतंत्र नोंदवही ठेवण्याच्या सूचना आहेत. बहुतांश कार्यालयांत पदे संख्येने अल्प असण्याची शक्यता असल्याने ३% आरक्षणानुसार पदांची परिगणना करणे कठीण आहे. केंद्र शासनाच्या धोरणानुसार गट-क व गट-ड मधील पदांचा गटनिहाय एकत्रित विचार करून आरक्षण ठेवण्यासाठी पदांची परिगणना करावयाची आहे. तथापि गट-अ व गट-ब संबंधात अशी परिगणना संवर्गानुसार करावी अशा त्यांच्या सूचना आहेत. केंद्र शासनाच्या या पद्धतीचा विचार करून व त्यामध्ये राज्यांच्या दृष्टीकोनातून बदल करून आरक्षित पदांच्या परिगणनेबाबत सुधारित

Deshpande\Handicap Letter\17

A. D. (P)
A. D.
A. D. (DC)
A. D. (ADM)
DY. E. E. (HRD)

पद्धती विहित करण्याचा विचार होता. या सुधारित पद्धतीमुळे एकाकी पद असले तरीही ते एकूण संवर्गात विचारात घेतले जाणार असल्याने आरक्षणातून वगळले तरीही परिगणनेनुसार फरक पडणार नाही. तसेच आरक्षण ठेवण्याची व राबविण्याची प्रक्रिया केंद्रीभूत होणार असल्याने आरक्षण ठेवण्याच्या व त्यानुसार पदे भरण्याच्या प्रक्रियेस गती येऊन त्याचा कार्यपालन अहवालही लवकर मिळु शकेल. त्याचप्रमाणे आरक्षण ठेवण्याबाबत व त्यानुसार पदे भरण्याबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्यांना मार्गदर्शन व्हावे व त्यांच्या शंकांचे निरसन व्हावे हा हेतुही आहे. हे विचारात घेऊन आता पुढील प्रमाणे तपशीलवार सूचना / मार्गदर्शन करण्यात येत आहे.

शासन परिपत्रक :-

अपंग व्यक्तींसाठी ठेवावयाच्या आरक्षणाबाबत पुढील प्रमाणे एकत्रित मार्गदर्शनात्मक स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

१) अपंग व्यक्तींसाठी गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड या संवर्गातील पदांसाठी आरक्षण ठेवावयाचे आहे.

२) अपंग व्यक्तींसाठी ठेवावयाचे आरक्षण सरळसेवेने करण्यात यावयाच्या नियुक्त्यांसाठी लागू आहे. (तथापि, सा.प्र.वि. शासन परिपत्रक दि.५.३.२००२ अन्वये फक्त गट-ड मधून गट-ड मधील, गट-ड मधून गट-क मधील व गट-क मधून गट-क मधील [illegible] पदोन्नतीसाठी हे आरक्षण लागू करण्यात आले आहे.)

सा.प्र.वि.परिपत्रक दि.२६.२.१९९९ अन्वये स्पष्ट करण्यात आल्यानुसार अपंग व्यक्तींसाठी ठेवावयाचे आरक्षण समांतर आरक्षण (Horizontal Reservation) असून ते ५२% सामाजिक आरक्षण (व खुल्या प्रवर्गासाठी असलेले ४८% प्रमाण) यामध्ये कप्पीकृत/ अंतर्भूत (Interlocking) आहे.

सा.प्र.वि. शासन परिपत्रक दि.४.३.२००२ अनुसार अपंग व्यक्तींसाठी असलेल्या [illegible] क्रमानुसार ठेवावयाची १०० रिक्त पदांची नोंदवही व नियुक्त्यांसाठी असलेली बिंदुनामावली या स्वतंत्र बाबी आहेत. तथापि अपंगांसाठी ठेवण्यात आलेल्या रिक्त पदांच्या नोंदवहीतील [illegible] क्रमांकानुसार अपंग उमेदवारांची मागणी करताना बिंदु नामावलीतील रिक्त बिंदुच्या [illegible] (मागासवर्गीय किंवा खुला) उमेदवारांची मागणी करावयाची आहे. तसेच केवळ अपंग [illegible] मागणी करावयाची नसून अपंगांच्या कोणत्या प्रवर्गासाठी (अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर, अस्थिव्यंग किंवा मेंदुचा पक्षघात) मागणी आहे, हे ही स्पष्ट करावयाचे आहे.

अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी अपंगत्वाचे [illegible] प्रमाण ४०% असणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती अधिनियमात [illegible] व्यक्तींची व्याख्या पुढील प्रमाणे करण्यात आली आहे.

"blindness" referes to a condition where a person suffers from any of [the fo]llowing conditions namely :-

(i) total absence of sight ; or

(ii) visual acuity not exeeding 6/60 or 20/200(snellen) in the better [eye] with correcting lenses; or

(iii) limitation of the field of vision subtending an angle of 20 degree [or] worse;

"Person with low vision" means a person with impairment of visual [func]tioning even after treatment [illegible] refractive correction but who

[illegible]\Handicap\Letter\18

uses or is potentially capable of using vision for the planning or execution of a task with appropriate assistive device;

" hearing impairment " means loss of sixty decibels or more in the better ear in the conversational range of frequencies.;

" locomotor disability" means disability of the bones, joints or muscles leading to substantial restriction of the movement of the limbs or any form of cerebral palsy;

" cerebral palsy " means a group of non-progressive conditions of a person characterised by abnormal motor control posture resulting from brain insult or injuries occurring in the pre-natal, peri-natal or infant period of development;

केंद्र शासनाच्या अधिनियमातील वर उल्लेख केलेली व्याख्या व संबंधित पदावर अपंगांसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाच्या आदेशात नमूद करण्यात आलेले अपंगत्वाचे प्रमाण / प्रकार विचारात घ्यावेत.

६) अपंग व्यक्तीची निवड झाल्यानंतर त्याची नियुक्ती करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यक मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची नियुक्ती करावी.

७) सा.प्र.वि.शा.नि. दि.१६ जून, २००१ अन्वये अपंग व्यक्तींसाठी उच्चतम वयोमर्यादा सरसकट <u>४५</u> वर्षांपर्यंत शिथिल करण्यात आली आहे.

८) अपंग व्यक्तीसाठी संबंधित जिल्ह्यांमधील शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय तज्ञांचे प्रमाणपत्र आधारभूत धरावे.

<u>अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणानुसार पदांची परिगणना</u>

सा.प्र.वि. परिपत्रक दि.२ मे, १९९८ अन्वये प्रत्येक संवर्गात अपंग व्यक्तींसाठी ३% आरक्षण ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच सा.प्र.वि. परिपत्रक दि.४ मार्च, २००२ अन्वये प्रत्येक पदासाठी १०० बिंदूंची स्वतंत्र नोंदवही ठेवून त्यामधील १, ३४ व ६७ हे बिंदू अपंगांसाठी आरक्षित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि प्रत्येक संवर्गातील पदे अपंग व्यक्तींसाठी आरक्षण ठेवण्याच्या दृष्टिने आवश्यक त्या संख्येने उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे व केंद्र शासनाने गट-क व गट-ड मधील पदांसाठी विहित केलेली पद्धती विचारात घेऊन अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणानुसार पदांची परिगणना करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

• मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून वर्षभरात सर्व गटात व सर्व संवर्गात उपलब्ध होणाऱ्या रिक्त पदांची माहिती मागवून १०० बिंदू नोंदवही ठेवावी. ही १०० बिंदू नोंदवही गट-अ, ब, क व ड अशी गटनिहाय ठेवावी. प्रत्येक गटाच्या नोंदवहीमध्ये त्या गटांतर्गत रिक्त होणाऱ्या सर्व संवर्गाचा / पदांचा समावेश करावा. रिक्त पदांमध्ये अपंग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवता येऊ शकतील असे ठरवून (Identified) आरक्षण ठेवलेली व अपंग व्यक्ती काम करु शकणार नाहीत असे दर्शविल्यामुळे (Non-identified) आरक्षण न ठेवलेली अशा दोन्ही प्रकारच्या पदांचा समावेश करावा. या नोंदवहीमधील क्रमांक १, ३४ व ६७ हे बिंदू अपंगांसाठी दर्शवावेत. या बिंदूंमधील एखादा बिंदू अपंग व्यक्तींसाठी अनारक्षित दर्शविलेल्या पदाचा असेल तर अपंग

व्यक्तींसाठी आरक्षित ठरविलेल्या पदाचा पुढील नजीकचा बिंदू विचारात घ्यावा. एखादी पद असले तरीही ते या नोंदवहीमध्ये समाविष्ट करावे. मात्र आरक्षित करावयाचा बिंदु ठरवितांना त्या बिंदुचा विचार न करता त्या पुढील नजीकच्या बिंदूचा विचार करावा. या सर्व रिक्त पदानुसार व अपंगांसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणानुसार अपंग प्रवर्गनिहाय पदांची संख्या निश्चित करून त्यांचे नियुक्ती प्राधिकाऱ्यांमध्ये वाटप करावे. हे वाटप अपंगाच्या विविध प्रवर्गांसाठी सुयोग्य ठरविलेली पदे विचारात घेऊन अपंगांच्या अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग किंवा मेंदुचा पक्षघात या तीनही प्रवर्गांमध्ये शक्यतो समान होईल याची दक्षता घ्यावी. यासाठी अपंगाच्या कोणत्याही प्रवर्गापासून आरक्षणाची सुरूवात करता येईल. तथापि हे करताना अंध / अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग/ मेंदूचा पक्षघात ही क्रमवारी ठेवण्यात यावी. नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यानुसार अपंग उमेदवारांची मागणी करून /नियुक्त्यांच्या विहित पद्धतीचे पालन करून पात्र अपंग उमेदवारांच्या नियुक्त्या कराव्यात. विभाग प्रमुखांनी १०० रिक्त पदांच्या नोंदवही नुसार नियुक्त्या झाल्यानंतर पुन्हा नवीन नोंदवही तयार करावी. तसेच विभाग प्रमुखांनी या संबंधातील कार्यवाही पारदर्शक, नि:पक्ष व तक्रारीस वाव राहू नये अशी असण्याबाबत पुरेपूर दक्षता घ्यावी.

मंत्रालयीन स्तरावरील आस्थापनेबाबत ही नोंदवही प्रशासकीय विभागामार्फत ठेवण्यात यावी. महामंडळे, मंडळे यांच्याबाबत ही नोंदवही त्यांच्या मुख्य कार्यालयात ठेवण्यात यावी. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीने भरण्यात येणाऱ्या मंत्रालयातील व बृहन्मुंबईतील ... संवर्गातील पदांबाबत ही नोंद वही सामान्य प्रशासन विभागामधील संबंधित कार्यासनांनी ठेवावी.

वरील पद्धतीमुळे संदर्भाधीन परिपत्रक क्र.२ व ३ मधील संवर्गानुसार आरक्षण व नोंदवही ठेवण्याबाबतच्या सूचना अधिक्रमित झाल्या आहेत असे समजावे. तसेच अपंग व्यक्तींच्या आरक्षणाबाबत व नियुक्त्यांबाबत वरील सूचनांच्या अनुषंगाने शंका उपस्थित झाल्यास त्याबाबत सामान्य प्रशासन विभागाचा निर्णय अंतिम समजावा. विशिष्ट पदावरील नियुक्तीबाबत जर ... / न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास ती संबंधित प्रशासकीय विभागांनी हाताळावीत. ...संबंधात आवश्यक असल्यास या विभागाशी सल्लामसलत करावी.

__...पुढे नेण्यात आलेल्या आरक्षणाचा अनुशेष__

अपंगाच्या ज्या विशिष्ट प्रवर्गाची मागणी करण्यात आली आहे, त्या प्रवर्गाचा उमेदवार ...या भरती वर्षात उपलब्ध न झाल्यास अपंग व्यक्ति अधिनियम १९९५ मधील तरतूद क्र.३६ ...नुसार हे पद पुढील भरती वर्षापर्यंत रिक्त ठेवावयाचे आहे. केंद्र शासनाच्या या संबंधातील ...नुसार हे आरक्षण तीन भरती वर्षांपर्यंत पुढे ओढावयाचे आहे. दरम्यानच्या कालावधीत ...च्या तीनही प्रवर्गात आंतरबदल (Inter change) करून सुयोग्य उमेदवार उपलब्ध ...त्यास पद भरावयाचे आहे. असे करूनही सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास तिसऱ्या भरती ...नंतर ते पद आरक्षण मुक्त करून अपंग उमेदवाराव्यतिरिक्त उमेदवारातून पद भरावे.

या परिपत्रकातील सूचना शासकीय /निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, महामंडळे, ... शासन अनुदानीत संस्था व ज्यांना मार्गदर्शक सूचना देण्याचा अधिकार शासनाला आहे

अशा सर्व संस्था व सेवा यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील. प्रशासकीय विभागांनी या सूचना त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांच्या निर्देशनास आणाव्यात.

हे आदेश या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील. तथापि या आदेशाच्या दिनांकापूर्वी नियुक्त्यांची प्रक्रीया सुरु असेल त्यांस हे आदेश लागू होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(व.दा. देशपांडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
*प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
*सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महापालिकांचे आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/नगरपालिका,
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
अवर सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
आयुक्त, अपंग कल्याण, ३, चर्च रोड, पुणे.
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती

* पत्राने.

D:\Deshpande\Handicap Letter\21

साप्रवि/सामान्य/निवडणूक/न.क्र.२४/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, प्लॉट नं. १,
तळमजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई-४०० ०१९.**

**प्रशासकीय परिपत्रक क्र.४२९ दि. २७.८.२००४**

विषय :- विधानसभा सार्वत्रिक निवडणूका २००४
भारत निवडणूक आयोगाच्या आचार संहितेचे पालन करण्याबाबत.

--------

सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वरील विषयावरील पत्र क्र. सी.ई.एल.-३८०४/प्र.क्र.४०७/ ०४/३३ दिनांक २४ ऑगष्ट २००४ सोबत जोडली आहेत. (सम क्रमांकाची दोन पत्रे)

२) शासनाच्या सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे आचार संहिता दि. २४.८.२००४ पासून ते २५.१०.२००४ म्हणजेच निवडणूक घोषणा केल्याच्या दिनांका पासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत लागू असेल. मंडळाच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी पत्रात दिलेल्या निर्देशानुसार आचार संहितेचे काटेकोरपणे पालन करावे.

सहपत्र : वरील प्रमाणे

**(सु.य.पाटील)**
**संचालक (कव)**

प्रत
प्रेषण यादीप्रमाणे विभागीय स्तरावरील सर्व क्षेत्रिय कार्यालये.

Election2004/ukw

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, मुंबई.

**ELECTION URGENT**

क्रमांक: सीईएल–३८०४/प्र.क्र.४०७/०४/३३,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२.
दिनांक : २४ ऑगस्ट, २००४.

प्रति,

मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,

सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

मा. मुख्य सचिव,

सर्व अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव,

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी

विषय:– विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२००४
भारत निवडणूक आयोगाच्या आचार संहितेचे पालन करण्याबाबत.

महोदय,

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा केली आहे. त्यानुसार राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघातून निवडणूक घेण्याबाबतचा कार्यक्रम जाहिर केला आहे. तसेच दिनांक २४/०८/२००४ ते दिनांक २५/१०/२००४ पर्यंत (निवडणुकीची घोषण केल्याच्या दिनांकापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत) भारत निवडणूक आयोगाने संपूर्ण महाराष्ट्र राज्यात आदर्श आचार संहिता लागू केली आहे. भारत निवडणूक आयोगाने त्यांच्या दिनांक २४/०८/२००४ च्या पत्रान्वये आदर्श आचार संहिते मधील खालील परिच्छेद सात (६) कडे आपले लक्ष प्रकर्षाने वेधण्यात येत असून व त्याचे कटाक्षाने पालन करण्यात यावे अशी आपणास विनंती आहे.

आयोगाकडून जेव्हा निवडणूक जाहीर करण्यात येईल तेव्हा पासून मंत्री महोदय किंवा इतर प्राधिकारी यांनी ज्यामुळे सत्ताधारी पक्षाच्या बाजूकडे मतदार आकर्षित होतील असे :–

(अ) कोणत्याही स्वरूपात कोणतेही वित्तीय अनुदान किंवा त्यासंबंधीचे आश्वासन देता कामा नये, किंवा

(ब) (नागरी सेवक वगळता) कोणत्याही प्रकारच्या प्रकल्पांची किंवा योजनेची कोनशिला बसविता कामा नये, किंवा

(क) रस्ते बांधण्याचे, पिण्याच्या पाण्याची सोय करण्याचे इ. कामाचे आश्वासन देता कामा नये, किंवा

(ड) शासन, सार्वजनिक उपक्रम, इत्यादि मध्ये कोणत्याही तदर्थ नेमणुका करु नयेत,''

आयोगाने असेही आदेश दिले आहेत की, निवडणूक घेण्याच्या संबंधातील कामाशी निगडीत असलेल्या सर्व अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यास पूर्णतया निर्बंध असेल. यामध्ये पुढील अधिकाऱ्यांचा/कर्मचाऱ्यांचा समावेश असेल. परंतु ती बाब तेवढयापुरती निर्बंधित नसेल.

(१) मुख्य निवडणूक अधिकारी आणि अतिरिक्त/सह/उप मुख्य निवडणूक अधिकारी.

(२) विभागीय आयुक्त.

(३) जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि निवडणूक कामाशी संबंधित असलेले अन्य महसूल अधिकारी.

४) पोलीस खात्याचे महानिरीक्षक, उपनिरिक्षक, जिल्हा पोलिस अधिक्षक, पोलिस उप अधिक्षक, उप विभागीय पोलिस अधिकारी तसेच लोकप्रतिनिधीत्व अभिनियम १९५१ च्या कलम २८–अ अन्वये भारत निवडणूक आयोगाकडे प्रति नियुक्त करण्यात आलेले अन्य सर्व पोलिस अधिकारी.

वरील संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश निवडणुकीच्या तारखा जाहिर होण्यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या असतील तथापि, अद्यापी त्यांची अंमलबजावणी झालेली नसेल, तर अशा आदेशांना भारत निवडणूक आयोगाची परवानगी घेतल्याशिवाय अमल देण्यात येऊ नये.

ही बंदी निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अस्तित्वात राहील. भारत निवडणूक आयोगाने असेही आदेश दिले आहेत की, राज्य शासनाने राज्यातील निवडणुकांच्या व्यवस्थापनाशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या यापुढे करु नयेत.

ज्या प्रकरणी, एखादया अधिकाऱ्याची बदली करणे प्रशासकीय दृष्टया अत्यंत आवश्यक असेल, तर अशा प्रकरणी राज्य शासनाने असा प्रस्ताव त्याबाबतच्या पूर्ण समर्थनासहित भारत निवडणूक आयोगाकडे पूर्व परवानगीकरिता पाठविणे आवश्यक आहे.

आपला,

(यु.पी.एस.मदान)
सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य.

साप्रवि/गट-८(रवका)/न.क्र.७६६/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा
मुंबई - ४०००१९.

**प्रशासकीय परिपत्रक क्र.४३० दि.२०/९/२००४**

विषय : संसद सदस्याकडून पाठविण्यात येणा-या पत्रांना वरिष्ठ शासकीय अधिका-यांकडून पोच देण्याबाबत.

......

महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्र.संकीर्ण-१०-०४/३१५/व्ही.आय.पी./२/१८(रवका) दिनांक १५ एप्रिल २००४ सोबत प्राप्त झालेले भारत सरकार यांचे ४८०११/५/२००३-रवका दि.२४ फेब्रुवारी २००४ चे पत्र सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांच्या परिपत्रक क्र.विमस-१०.०१/प्र.क्र.४५/२००१/१८ (रवका) दि.३.२.२००३ सह सोबत जोडले आहे. त्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, या पूर्वी या संदर्भात मुख्य कार्यालयाने प्रशासकीय परिपत्रक क्र.१४८ दि.१८.८.९५ व क्र.३८६ दि.२६.३.२००३ अन्वये संसद सदस्याकडून प्राप्त झालेल्या पत्रांना पोच देण्याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या आहेत.

सर्व संबंधित क्षेत्रिय कार्यालये व मुख्य कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख यांना पुन्हा एकवार सूचित करण्यात येते की, या बाबत निर्गमित केलेल्या सर्व परिपत्रकातील सूचनांचे कसोशीने पालन करण्याच्या सूचना त्यांच्या कार्यक्षेत्रात येणा-या सर्व अधिकारी यांना देण्यात याव्यात.

सोबत : वरीलप्रमाणे.

सचिव

प्रत :
प्रेषण यादीप्रमाणे,
कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत सर्वांना

E/P.N.766 2

२१५

( परोक्षत संसद सदस्यांकडून पाठविण्यात येणाऱ्या पत्रांना वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांकडून पोच / उत्तरे देण्याविषयी मा.श्री.हरिन पाठक,केंद्रीय राज्यमंत्री, कार्मिक, लोक प्रशासन तथा पेन्शन,भारत सरकार यांचे क्रमांक : 48011/5/ 2003-O & M,दि.१४ फेब्रुवारी,२००४ चे मा.मुख्यमंत्र्यांना पाठविलेले अर्ध शासकीय पत्राची प्रत)

References have been received from Hon'ble members of Parliament in regard to the Non-acknowledgement of their letters by Senior Government Functionaries.

2. It would be recalled that clear instructions have been prescribed in paragraphs 63, 66 and 127 of the Central Secretariat Manual of Office Procedure in respect of letters received from the Hon'ble Members of Parliament which have reiterated by the Ministry of Personnel,Public Grievances and Pensions from time to time.

3. It is requested that effective steps be taken urgently so as to ensure that delays do not occur in the disposal of references received from Hon'ble members of Parliament and appropriate directions issued to the Attached / Subordinate offices and Public Sectors Undertakings under your administrative control in this behalf. The matters needs also to be monitored regularly in your Departmental Meetings with the Senior Officers.

---

तात्काळ

१०७

३३१२०
२०/८/०४

क्रमांक : संकीर्ण-१०.०४/३१५/व्ही.आय.पी.-२/१८ (र.व का.)
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ एप्रिल, २००४.

सर्व मंत्रालयीन विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव (आस्थापना) यांजकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता सादर अग्रेषित.

२. त्यांना विनंती करण्यात येते की, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. विमस-१०.०१/प्र.क्र.४५/२००१/१८ (र.व का.), दिनांक ३ फेब्रुवारी,२००३ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच हे पृष्ठांकन आपल्या अधिपत्याखालील विभागप्रमुख / कार्यालयप्रमुखाच्या नजरेस आणून द्यावे.

(श्री.वि.होटकर)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

संसद सदस्य, विधानसभा/विधानपरिषद सदस्य यांचेकडून आलेल्या पत्र/अर्ज/निवेदनांना पोच देणे/त्यावर सत्वर कार्यवाही करणे, माहिती पुरविणे व अंतिम उत्तर देणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र.विमस-१०.०१/प्र.क्र.४५/२००१/१८(रवका),
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३ फेब्रुवारी,२००३.

वाचा :-

१. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.विमस-१०९५/६६४/९८/ १८(रवका), दि.२५ऑगस्ट,१९९५.
२.शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.विमस-१०९६/१७६/प्र.क्र.४५/९६/१८ (रवका), दि.२० फेब्रुवारी,१९९६.
३. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.विमस-१०९८/प्र.क्र.२५/९८/१८ (रवका), दि.८ मे,१९९८.
४. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.विमस-१०९९/प्र.क्र.१९३/९९/१८ (रवका), दि.६/४/२०००.
५.शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.विमस-१०.०१/प्र.क्र.४५/२००१/१८ (रवका), दि.२३ ऑक्टोबर,२००१.
६.शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.विमस-१०.०१/प्र.क्र.४५/२००१/१८ (रवका), दि.११ जुलै,२००२.

## परिपत्रक

संसद सदस्य, विधानसभा/विधानपरिषद सदस्य यांचेकडून आलेल्या पत्र/अर्ज/निवेदनांना पोच देणे/त्यावर सत्वर कार्यवाही करणे, माहिती पुरविणे व अंतिम उत्तर देणेबाबत या विभागाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकान्वये केलेल्या सूचनांचे / आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत राज्य शासनाच्या सर्व विभागांना / कार्यालयांना सूचित करण्यात आले होते. तथापि,सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले असल्याने सामान्य प्रशासन विभागाच्या समक्रमांकाच्या दिनांक ११ जुलै,२००२ च्या परिपत्रकाचा पुनरुच्चार करुन खालीलप्रमाणे सुधारीत सूचना / आदेश देण्यात येत आहेत-

१. (अ) पत्रांना पोच व अंतिम उत्तर देणे :-

१. संसद सदस्य, विधानसभा/विधानपरिषद सदस्य यांनी मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, मंत्रालयीन विभागांचे सचिव, विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख व इतर वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रांना तसेच ज्यावेळी केंद्रीय मंत्री / राज्यमंत्री हे सचिव / विभाग प्रमुख यांना पत्रे लिहितात त्यावेळी राजशिष्टाचारानुसार त्यांचे खाजगी सचिव (private secretary)/ अतिरिक्त खाजगी सचिव ( Additional private secretary) पत्रावर सही करुन संबंधीत पत्र मंत्र्यांचे आदेशावरुन / सूचनेवरुन लिहीले आहे अशाही पत्रांना त्यावर मुख्यमंत्री,मंत्री,राज्यमंत्री अथवा वरिष्ठ अधिकारी यांचे काहीही आदेश / शेरे नसले तरी मुख्यमंत्री,मंत्री,राज्यमंत्री व ज्या अधिकाऱ्यांना पत्रे पाठविली असतील त्या अधिकाऱ्यांनी स्वतःच्या स्वाक्षरीनेच एका आठवडयाच्या आत पोच देण्यात यावी व अशा पत्रांवर सत्वर कार्यवाही करुन एक महिन्याच्या आत अंतीम उत्तर देण्यात यावे. जर निर्णय होण्यास विलंब लागणार असेल तर त्याप्रमाणे देखील संबंधित संसद सदस्य विधानसभा / परिषद सदस्य यांना कळविण्यात यावे म्हणजे त्यांच्या मनात संशय राहणार नाही.

२. पोच पावती व उत्तरे कोणत्याही परिस्थितीत मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री यांच्या स्वीय सहाय्यकांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात येऊ नयेत. पत्र ज्या मंत्री महोदयांना / अधिका-यांना पाठवले असेल त्याच मंत्रीमहोदयांच्या व अधिका-यांच्या सहीने पाठविण्यात यावे.

३. क्षेत्रीय स्तरावरील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांनी अशा सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन संसद सदस्य, विधानसभा / विधानपरिषद सदस्यांच्या पत्रांना एक आठवडयात पोच द्यावी व एक महिन्याच्या आत अंतिम उत्तर पाठवावे.

ब) पत्रावर सत्वर कार्यवाही करणे :-

१. संसद सदस्य, विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांच्या पत्रांची शासनाच्या सर्व विभागांनी / कार्यालयांनी तातडीने दखल घेऊन, त्यांनी पत्रात नमूद केलेल्या कार्यवाहीबाबत नियमान्वये सत्वर कार्यवाही करावी.

२. संसद सदस्य, विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचेकडून आलेल्या पत्रावर / अर्जावर / निवेदनावर तातडीने कार्यवाही करुन एक महिन्याच्या आत अंतिम उत्तर देणे आवश्यक असल्याने व अशा पत्रावर सत्वर कार्यवाही होते किंवा नाही ते पाहण्यासाठी शासनाच्या सर्व विभागांनी / कार्यालयांनी या परिपत्रकासोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार नोंदवहया ठेवाव्यात. हया नोंदवहया अद्ययावत ठेवल्या जातील असे पहावे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व कार्यासन अधिकाऱ्यांनी हया नोंदवहयांची वेळोवेळी पाहणी करुन अशा पत्रांना वेळीच पोच व उत्तरे पाठविली जातात किंवा नाही हे तपासावे.

३. सर्व मंत्र्यांच्या खाजगी सचिवांनी व राज्यमंत्र्यांच्या स्वीय सहायकांनी त्यांच्या कार्यालयात संसद सदस्य / विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांच्याकडून आलेली पत्रे / निवेदने इत्यादींसाठी एक नियंत्रण वही ठेवावी.

४. एखादया पत्रावर कार्यवाही पूर्ण करुन एक महिन्यात अंतिम उत्तर देणे शक्य नसल्यास संबंधित कार्यासन अधिकाऱ्यांनी ही बाब पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांच्या नजरेस आणावी आणि त्यासंबंधीची नोंद करण्यात यावी.

५. संसद सदस्य, विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांच्या पत्रावर / संदर्भावर मंत्रालयीन विभागांनी संबंधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांचेकडून काही माहिती मागविल्यास ती माहिती त्यांनी शासनास तात्काळ पाठवावी.

क) संसद सदस्य, विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांना माहिती पुरविणे :-

मंत्रालयीन विभाग, विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांचेकडे संसद सदस्य,विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांनी त्यांची संसदीय कामकाजविषयक कर्तव्ये पार पाडण्यासाठी जनतेच्या कल्याणाविषयक बाबींसंबंधीच्या माहितीची मागणी केल्यास, सदर माहिती गोपनीय स्वरुपाची नसल्यास त्यांना पुरविण्यात यावी. तथापि,सदर माहिती
गोळा करुन पुरविण्यास,शासकीय विभागास / कार्यालयास अकारण श्रम किंवा आर्थिक भुर्दंड पडत असल्यास सदर माहिती पुरविण्यास नम्रपणे नकार देण्यात यावा.

२. पत्र हातात पडल्याबरोबर ते नेमके कोणाकडून आलेले आहे हे तावडतोब लक्षात आले पाहिजे म्हणून कार्यालयाचा पत्ता नेहमी पत्राच्या शिरोभागी उजवीकडे दिलेला असावा. कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक, असल्यास फॅक्स क्रमांक, ई-मेल,वेबसाईट यांचाही उल्लेख पत्रावर करावा व त्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन विभागांनी ई-मेलचा वापर करावा,जेणेकरुन संबंधितांशी संपर्क साधणे सुलभ होईल. तसेच तारेचा पत्ता असेल तर तोही शिरोभागी लिहावा, पत्र ज्याला पाठवावयाचे असेल त्याचा पत्ताही अचूक लिहणे आवश्यक आहे अशा सूचना प्रशासनीक लेखन या पुस्तकामध्ये "मसुदे व टिप्पणी लिहीण्यासंबंधी" दिलेल्या सूचनांमध्ये नमूद केले आहे.

३. या सूचनांचे/ आदेशांचे राज्य शासनाच्या सर्व विभागांनी / कार्यालयांनी काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

४. संसद सदस्य, विधानसभा / विधानपरिषद सदस्यांना विहित कालावधीत पोच व उत्तर देण्याबाबत अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ व कुचराई केली असे निदर्शनास आल्यास त्या अधिकाऱ्याविरुध्द गंभीर दखल घेतली जाईल, याची सर्व अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

५. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक यांनी कृपया वरील सूचना / आदेश संबंधित माननीय मंत्री / राज्यमंत्री यांच्या निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

राजेंद्र सिंह
प्रधान सचिव (प्र.सु. व र. व का.)

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव,
२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक,
५. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन,मुंबई,
६. शासनाचे मुख्य सचिव,
७. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
८. सचिव, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
९. सर्व मंत्रालयीन विभाग,
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१३. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील इतर सर्व विभाग व कार्यालय प्रमुख,
१४. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
१५. निवड नस्ती / १८ (र. व का.)

एच-1091(3,500-2-02)-2

C.R.45-2001

शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : विमस-१०.०१/ प्र.क्र.४५ / २००१ / १८ (रवका)

दिनांक : ३ फेब्रुवारी,२००३.

## विवरणपत्र

| अ.क्र. | संसद सदस्य, विधानसभा / विधानपरिषद सदस्यांचे नांव | पत्राचा दिनांक | पत्रातील विषय | कार्यासनात पत्र प्राप्त झालेला दिनांक | पत्र सादर करण्याचा दिनांक | स्मरणपत्र पाठविल्याचा दिनांक | उत्तर दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

GAD/Gr.VIII(O&M)/F.No.896/
Maharashtra State Elecy. Board
Estrella Batteries Expansion Building,
Ground Floor, Plot No.1, Dharavi Rd.
Matunga, Mumbai-400 019.

**ADMINISTRATIVE CIRCULAR NO. 431 DATE 30.09.2004**

Sub: Extending the validity of the select lists of Departmental promotions.

---

The Regulation 29(b) of the MSEB Classifications and Recruitment Regulations, 1961 provides that the select lists of departmental promotions shall remain valid for a maximum period of one year or upto, 30th September of each year whichever is earlier.

2. The Election Commission has enforced the Model Code of Conduct on account of Maharashtra Assembly General Elections – 2004 with effect from 24.08.2004 to 25.10.2004. The directives have been issued vide this office letter No. GAD/Gen/Election/2422 dt. 10.09.2004 that no transfer should be effected during the enforcement of the Code of Conduct on account of Maharashtra Assembly General Elections–2004. Since the posting on promotion involves transfers, the Appointing Authorities could not operate the select lists prepared for the departmental promotions prior to 30th September 2004.

3. In view of the above, the issue regarding extending the validity of the select lists of departmental promotions beyond 30.09.2004 was under consideration of the Board. The Board under its Resolution No 248 dt. 30.09.2004 has accorded approval to extend the validity of the select lists of departmental promotions prepared prior to 30th September 2004 and could not be operated/partly operated due to enforcement of the Model Code of Conduct on account of Maharashtra Assembly Election–2004 upto 30.11.2004.

4. All the Appointing Authorities in Head office and field are requested to please take a note of the above decision of the Board and take action accordingly.

(S.Y.Patil)
Director of Personnel

To
All as per mailing list upto the level of E.E. and above in H.O. & field.

(29)

GAD/Estt./Gr.VIII-(O&M)/F.No.370
Maharashtra State Electricity Board
Estrella Batteries Expansion Building
Ground Floor, Plot No.1, Dharavi Road
Matunga, Mumbai – 400 019

## *ADMINISTRATIVE CIRCULAR NO.432 DATE 30/09/2004*

Sub : Redressal of the monetary grievances/claims of the employees.

---

As a part of Internal Reforms, a Grievance Redressal Drive for clearing pending grievance/monetary claims of the employees as on 31/12/2002 was launched vide Circular No.GAD/Estt.Gr.VIII-(O&M)/F.No.370/6165 dt.28th February 2003. Subsequently, this special drive was continued beyond December 2002 and a second drive for clearing the pending monetary claims/grievances as on 30/6/2003 was undertaken vide Circular No.GAD/Estt.Gr.VIII-(O&M)/F.No.370/21484 dt.27th June 2003.

2. The Review of the Grievance Redressal Drive was taken from time to time in the Meetings of the E.Os/Dy.E.Os/Incharge of GAD in Zonal Office in the field. The Review was also taken by the Guardian Officers during their visits to the assigned areas.

3. Though the special drive as on 31/12/2002 and 30/6/2003 are over, it has been decided to make the grievance redressal of the employees as a part of regular duty and responsibility of the GAD Officers. It has also been decided that the annual performance of the GAD Officers shall be evaluated mainly on the basis of achievements made in the grievance redressal system. Therefore, the grievance redressal system shall continue to operate as hitherto before.

4. The issue regarding review of some of the items of the grievance redressal drive was also under consideration. The items of the monetary grievances/claims were discussed in the meeting with all the EOs/Dy.EOs/Incharge of GAD held on 3rd June 2004 at Nashik and also thereafter with the Unions and it has been decided to include the following items in the grievance redressal system for follow up and monitoring :-

1) G.O.74/111 (Grant of Higher grade benefit) cases
2) T.A. claims (including L.T.C. and Transfer T.A.)

6.10.04

श्री. कोर – फाईल .

3) O.T. claims
4) Medical Advances and reimbursement claims in case of serious diseases/Advance in case of accidents
5) Passing of Marathi Language Examination by non-Marathi speaking persons
6) Nomination position (CPF, EPS, Gratuity)
7) Final settlement of claims of retired/deceased employees (Gratuity, CPF, EPS)
8) Release of Surety in case of HBA - position thereof
9) Release of Mortgage deed of HBA - position thereof
10) Supply of rainy season material/uniform cloth/T&P-position thereof

5. The review will be taken in the monthly meeting of the D.O.P., bimonthly meeting of Secretary and by the GAD Guardian Officer during their visits. In the review the analysis will be presented by the concerned GAD incharge of the Zone with action plan to clear/settle the pending claims. A proforma in which information of pending monetary claim and other items is to be furnished is enclosed as Proformas 'I-1' to 'I-2'. Consequently, Proforma – 'I' circulated along with minutes of meeting of EOs/Dy.EOs vide letter No.GAD/Estt./AD(P)/Mtg/F.No.844/1477 dt.2/7/2004 shall stand cancelled.

6. All the EOs/Dy.EOs and Heads of GAD upto the level of Division are requested to take a note of the above grievance redressal mechanism and ensure to submit the information from time to time.

7. The above instructions should be followed scrupulously and any dereliction of the duties on the part of GAD Officers shall be viewed seriously.

8. This Circular is issued with the approval of the Secretary.

*(S. Y. Patil)*
***Director of Personnel***

To
All upto the level of E.E. & above

*md:Special Drive*

**PROFORMA - I-1**

## Pending monetary claims and position of clearance at the end of month _______

| Sr. No | Item of Monetary Grievance | Pending claims for | | | | | Cases cleared during the month under report | | | | | Balance cases | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | More than 3 months | More than 6 months | More than 9 months | More than 1 year | Total | More than 3 months | More than 6 months | More than 9 months | More than 1 year | Total | More than 3 months | More than 6 months | More than 9 months | More than 1 year | Total |
| 1) | T.A. claims (including LTC/Transfer T.A.) | | | | | | | | | | | | | | | |
| 2) | O.T. claims | | | | | | | | | | | | | | | |
| 3) | G.O.74/111 Higher grade benefit cases | | | | | | | | | | | | | | | |
| 4) | Increments pending on account of<br>i) Non-Passing Marathi Language Examination<br>ii) For want of confirmation | | | | | | | | | | | | | | | |
| 5) | Medical cases of serious diseases/illness<br>i) Advances outstanding (in lakhs)<br>ii) Reimbursement bills pending in numbers | | | | | | | | | | | | | | | |
| 6) | Final settlement of deceased/retired employees<br>i) Gratuity<br>ii) CPF<br>iii) EPS/EFPS<br>iv) Leave Encashment | | | | | | | | | | | | | | | |

PROFORMA – I - 2

## Position of non-monetary claims/items pending at the end of the month ______

| Sr.No. | Item | Total no. of employees working in Zone/or covered under the item | Pending |
|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. |
| 1) | Confirmation | | |
| 2) | Nomination<br>i) C.P.F.<br>ii) Gratuity<br>iii) E.P.S. | | |
| 3) | Supply of<br>i) Rainy Season Material (block year ____)<br>ii) Uniform Cloth (block year ____)<br>iii) T&P | | |
| 4) | Release of Surety in case of HBA | | |
| 5) | Release of Mortgage deed | | |

Note : 1) Against item No.(3) eligible employees for issue of Rainy Season Material/Uniform Cloth/T&P should be indicated in Column-3 and balance remained to be issued should be indicated in Column-4.

2) Against item No.(4) & (5) No. of employees in whose case HBA alongwith interest has been repaid during last quarter should be indicated in Column No.(3) and No. of employees in whose case Surety/Mortgage remained to be released should be indicated in Column No.(4).

साप्रवि/गट-८(रवक्र)/न.क्र.३५१
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा
मुंबई - ४०००१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र.४३३ दि.३०/९/२००४

विषय : आर.के.समरवाल आणि इतर विरुध्द पंजाब राज्य प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने आरक्षणाबाबतचे आदेश.

वाचा : १) प्रशासकीय परिपत्रक क्र.२४६ दि.२१.११.१९९७
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.२६० दि.२९.११.१९९८

......

प्रशासकीय परिपत्रक क्र.२४६ दि.२१.११.१९९७ द्वारे प्रसारित केलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करीत असतांना काही मुद्दे मार्गदर्शनासाठी उपस्थित करण्यात आले होते. त्याचे स्पष्टीकरण प्रशासकीय परिपत्रक क्र.२६० दि.२९.१.१९९८ द्वारे करण्यात आले होते. सदर परिपत्रकातील "बदली व प्रतिनियुक्तिच्या पदांना बिंदू नामावली वापरु नये" या मुद्दा क्र.३ बाबत केलेल्या स्पष्टीकरणाचा फेरविचार करावा ही मागणी मंडळाच्या विचाराधीन होती.

२. सदर बाबत पुनर्परिक्षण करण्यात येऊन मुद्दा क्र.३ मध्ये दिलेले स्पष्टीकरण खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

"महाराष्ट्र शासन निर्णय क्र. बीसीसी-१०९७/प्रक्र/६३/९७/१६-ब दि.१८.१०.१९९७ च्या परिच्छेद २(६) नुसार बदली किंवा प्रतिनियुक्तिच्या पदांना बिंदु नामावली वापरु नये अशी तरतूद आहे. सदर तरतूद विचारात घेता संवर्गबाहय बदली बाबत संमती पत्र देण्यापूर्वी मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यावर मंडलांतर्गत किंवा विभागांतर्गत बदली करताना अशी संमती बाधक ठरणार नाही याची काळजी संबंधित सक्षम अधिका-यांनी घ्यावी. अनुशेष भरुन काढण्याची सर्वस्वी जबाबदारी नियुक्ती अधिका-याची राहील".

३. प्रशासकीय परिपत्रक क्र.२६० दि.२९.१.१९९८ मधील इतर स्पष्टीकरणात्मक बाबी अबाधित राहतील.

४. सदर परिपत्रक मा.अध्यक्षांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(सु.य.पाटील)
संचालक (कर्मचारीवर्ग)

प्रेषण यादीप्रमाणे
कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरापर्यंत

—

साप्रवि/सामान्य/निवडणूक/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला, धारावी रोड
माटुंगा, मुंबई - ४०००१९.

**प्रशासकीय परिपत्रक क्र.४३४ दिनांक ६.१०.२००४**

विषय : विधानसभा सार्वत्रिक निवडणुका - २००४.
भारत निवडणूक आयोगाच्या आदेशाचे पालन करणेबाबत.
संदर्भ : प्रशासकीय परिपत्रक क्र.४२९ दि.२७.८.२००४.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूका २००४ च्या अनुषंगाने पाळावयाच्या आचार संहितेच्या संदर्भात शासनाकडून प्राप्त झालेल्या सूचना या विभागाच्या संदर्भिय प्रशासकीय परिपत्रकाद्वारे या आधीच निर्गमित केलेल्या आहेत. कक्ष अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडून परिपत्रक क्र.३५०४/३३ दि.२४ ऑगस्ट २००४ अन्वये प्राप्त झालेल्या आदेश/सूचना सोबत जोडून पाठवित आहे.

२. सदर परिपत्रकाद्वारे शासनाने दिलेल्या आदेशानुसार मंडळाच्या ज्या कर्मचा-यांना निवडणूकीच्या कामासंबंधी प्रशिक्षण तसेच निवडणूकीच्या दिवशी केलेल्या नियुक्तीच्या अनुषंगाने नियुक्ती पत्रे मिळाली आहेत अशा सर्व कर्मचा-यांना निवडणूक कर्तव्यासाठी नेमून दिलेल्या दिवशी सदर कामासाठी न चुकता पाठवावे. तसेच ज्या कर्मचा-यांच्या बदल्या/बढत्या आधीच झालेल्या आहेत व त्यांची निवडणूक कामी नियुक्ती झाली असेल तर अशा कर्मचा-यांच्या बदली/बढतीवरील कार्यमुक्तीचा विचार निवडणूकीचे काम संपल्यानंतरच करावा. तसेच निवडणूकीच्या कामी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांना कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करण्यात येऊ नयेत.

३. मंडळाच्या सर्व संबंधित अधिका-यांना कळविण्यात येते की शासनाच्या निर्देशानुसार सदर आदेशांचे/सूचनांचे काटेकोरपणे पालन करून त्यांनी शासन निवडणूक यंत्रणेस सक्रिय हातभार लावावा.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

(सु. य. पाटील)
संचालक (कर्मचारीवर्ग)

प्रत :
प्रेषण यादीप्रमाणे विभागीय स्तरावरील सर्व क्षेत्रिय कार्यालये.

E/Election-2004

[illegible] मतदान केंद्रावर [illegible] वर्ग आणि कर्मचा-यांच्या [illegible] रजा मंजूर न करण्याबाबत.

INDUSTRIES, ENERGY AND [illegible] DEPARTMENT

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक - सीईएल-३५०४/३३,
मंत्रालय, मुंबई ४०००३२,
दिनांक : २४ ऑगस्ट २००४

## परिपत्रक

विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका ऑक्टोबर,२००४ मध्ये घेण्यात येणार आहेत. या निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्रावर तसेच मतमोजणी केंद्रावर काम करण्याकरिता जिल्हा निवडणूक अधिका-यांना मोठ्या प्रमाणावर कर्मचारीवर्गाची आवश्यकता लागणार आहे. अशा (मतदान केंद्रावर काम करण्यासाठी, तसेच मतमोजणीच्या कामासाठी घेण्यात आलेल्या) कर्मचारीवर्गाला त्यांच्या निवडणुकीच्या कामाशी संबंधित प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिका-याकडून प्रशिक्षण वर्ग व तालमी आयोजित करण्यात येतील. सबब, सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील सर्व कर्मचा-यांच्या सेवा निवडणुकीच्या कामासाठी जिल्हा निवडणूक अधिका-यांना उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच त्यांना आवश्यकतेनुसार प्रशिक्षणासाठी हजर राहण्याकरिता कार्यमुक्त करावे.

२. सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना अशीही विनंती करण्यात येते की, निवडणूकीची प्रक्रिया संपेपर्यन्त निवडणुकीच्या कामासाठी घेण्यात आलेल्या कोणाही कर्मचा-याची बदली करु नये. तसेच त्यांना नैमित्तिक रजेव्यतिरिक्त सबळ कारणाशिवाय इतर कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये.

३. निवडणुकीसंबंधीचे काम दिलेल्या कोणत्याही अधिकारी/कर्मचा-यांकडून कर्तव्याचा भंग झाल्यास असा अधिकारी/कर्मचारी लोकप्रतिनिधित्व अधिनियम,१९५१ च्या कलम १३४ अनुसार दंडनीय शिक्षेस पात्र ठरेल. संबंधित कलम खालीलप्रमाणे आहे :-

निवडणुकीसंबंधीच्या अधिकृत कर्तव्याचा भंग-(१) ज्या व्यक्तीला हे कलम लागू होते ती व्यक्ती, वाजवी कारणाशिवाय स्वतःच्या अधिकृत कर्तव्याचा भंग करुन कोणत्याही कृती किंवा अकृती करण्याबद्दल दोषी असेल तर ती व्यक्ती पाचशे रुपयांपर्यन्त असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

वाय-629(ए)(5000-8-04) (कृ.मा.प.

C:\lotus\work\wordpro\Govt. Resolution

(१-अ) पोट कलम (१) खाली दंडनीय असलेला गुन्हा दखलपात्र असेल.

(२) पूर्वोक्त अशा कोणत्याही कृतीच्या किंवा अकृतीच्याबाबत नुकसान भरपाई मिळण्यासाठी अशा कोणत्याही व्यक्तीविरुध्द कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

(३) ज्या व्यक्तींना हे कलम लागू होते, त्या म्हणजे जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि नामनिर्देशन स्वीकारणे किंवा उमेदवारी मागे घेणे यांच्या संबंधीचे काम किंवा निवडणुकीच्या वेळी मतदार नोंदणीचे किंवा मतमोजणीचे काम करण्यासाठी नियुक्त केलेली अन्य कोणती व्यक्ती होत आणि या कलमाच्या प्रयोजनार्थ "अधिकृत कर्तव्य" ह्या संज्ञेचा अर्थ त्यानुसार लावला जाईल. पण त्यामध्ये या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली नव्हे तर अन्यथा दिलेल्या कामाचा समावेश असणार नाही.

सर्व मंत्रालयीन विभाग, विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख यांनी वरील तरतूद त्यांच्या कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अरुण कुमार बागो )
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
निवड नस्ती.

* पत्राने

---

C:\lotus\work\wordpro\Govt. Resolution
शाय–629(ए)(5000–8–04)

(29)

साप्रवि/गट-८(रवका)/न.क्र.३५१
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला,धारावी रोड,माटुंगा
मुंबई - ४०००१९.

**प्रशासकीय परिपत्रक क्र.४३५ दि.४/१०/२००४**

विषय : माहे एप्रिल २००४ मध्ये झालेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचे वेळी मंडळाच्या वाहनचालक पदावरील कर्मचा-यांनी केलेल्या अतिरीक्त कामासाठी अतिकालीक भत्ता देणे.

.......

मंडळातील वाहन चालकांच्या सेवा निवडणूकीच्या कामासाठी वेळोवेळी अधिग्रहीत करण्यात येतात. निवडणूकीच्या कामी अशा वाहन चालकांनी कामाच्या तसेच सुट्टीच्या दिवशी केलेल्या जादा कामापोटी अतिकालीक भत्त्याचे परिगणन तसेच सदर भत्ता कोणी अदा करावा याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून वारंवार विचारणा करण्यात येत होती. या प्रकरणी शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झाले आहे.

२. महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी यांनी जो शासन निर्णय क्र.ईएसटी-१२०४/प्र.क्र.२४४/०४/३३ दि.१६.६.२००४ निर्गमित केला आहे तो माहितीस्तव सोबत जोडला आहे. त्यात नमूद केलेल्या शर्तींच्या अधिन राहून मंडळाच्या ज्या वाहनचालकांच्या सेवा माहे एप्रिल २००४ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीच्या कामासाठी शासनाने अधिग्रहीत केल्या होत्या, त्या वाहनचालकांना सदर कालावधीत केलेल्या अतिरिक्त कामाचा अतिरिक्त भत्ता अदा करण्यासाठी शासन निर्णयात नमूद केलेल्या परिच्छेद क्र.३ प्रमाणे अतिकालीक कामाच्या भत्त्याची देयके तयार करून संबंधित जिल्हाधिका-यांकडे अदायगीसाठी पाठवावीत.

सोबत : शासन निर्णयाची प्रत.

(स्वाक्षरी)
संचालक (कर्मचारीवर्ग)

प्रत :
प्रेषण यादीप्रमाणे
कार्यकारी अभियंता-व तत्सम स्तरापर्यंत.

29.10.04
श्री. कोर - फाईल

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : ईएसटी-१२०४/प्र.क्र.२४४/०४/३३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६ जून, २००४

शासन निर्णय :-

मागे एप्रिल २००४ मध्ये झालेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचे काम पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकाऱ्यांकडून सरकारी व निमसरकारी विभाग आणि इतर संस्थांकडून मोठ्या प्रमाणांवर चालाकांसह वाहने अधिग्रहित करण्यात आली होती. अशा अधिग्रहित केलेल्या वाहनांच्या निरनिराळया प्रवर्गातील-वाहनचालकांना अतिकालिक भत्ता देण्यास शासन मंजूरी देत आहे.

२. अतिकालिक भत्ता मिळण्याचा हक्क असणाऱ्या वाहन चालकांना पुढे उल्लेखिलेल्या दराने आणि शर्तीच्या अधीनतेने अतिकालिक भत्ता देय राहील :-

अतिकालिक भत्त्याचा दर :-

१) अधिग्रहित केलेल्या वाहनांच्या चालकांना वाहने अधिग्रहित केलेल्या दिनांका पासून अधिग्रहणाच्या कालावधीतील दिनांक २९ फेब्रुवारी, २००४ ते २५ मे, २००४ पर्यंत हा कालावधी वगळून इतर अधिग्रहणाच्या कालावधीकरीता त्यांच्या मूळ विभागामध्ये / संस्थांमध्ये अनुज्ञेय असलेल्या दराने, अतिकालिक कामाच्या तासांवर कोणतेही निर्बंध न लावता, मूळ विभाग/संस्थेद्वारे प्रचलित अतिकालिक भत्ता देय राहील.

२) अधिग्रहित केलेल्या वाहनांच्या चालकांना अधिग्रहणाच्या कालावधीतील दि. २९ फेब्रुवारी, २००४ ते २५ मे, २००४ (दोन्ही दिवस धरुन) या कालावधीकरिता, अतिकालिक कामाच्या तासांवर कोणतेही निर्बंध न लावता अतिकालिक भत्ता कोणत्याही एका कामाच्या दिवशी केलेल्या कामाच्या पूर्ण तासाला (अर्धातास किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी पूर्ण तास धरण्यात येईल.) प्रत्येक तासाच्या मूळ वेतनाच्या प्रमाणात देय राहील. (टीप :- दर दिवशी आणि दर ताशी वेतनाचा दर ठरविण्यासाठी महिना ३० दिवसांचा आणि दिवस ९ तासांचा समजण्यात येईल.)

**शर्ती :-** २/१/८

१) अतिकालिक भत्ता संबंधीत वाहन चालकाच्या माहे एप्रिल २००४ या महिन्याच्या सुधारीत वेतनश्रेणीतील मासिक मूळ वेतनाच्या आधारे काढलेल्या दराने दिला जाईल. हा दर काढताना मूळ वेतनामध्ये इतर भत्त्यांचा (म्हणजेच विशेष वेतन, घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, स्थानिक पूरक भत्ता इत्यादी) समावेश होणार नाही.

२) कामाच्या दिवशी ९ तासापेक्षा जास्त काम केल्यास (भोजन समय धरुन) जादा केलेल्या कामासाठी अतिकालिक भत्ता देय राहील.

३) अधिग्रहणाच्या कालावधीत रविवारी व इतर सुट्टीच्या दिवशी केलेल्या निवडणुकांच्या कोणत्याही कामाच्या पूर्ण वेळेसाठी हा अतिकालिक भत्ता देय राहील.

४) अधिग्रहणाच्या कालावधीत वाहनचालक दौऱ्यावर असताना कामाच्या नियमित वेळेपक्षा जास्त केलेल्या कामाबद्दल अतिकालिक भत्ता मंजूर करताना फक्त ज्या कालखंडात ज्या वाहन चालकाने प्रत्यक्ष गाडी चालविण्याचे काम केले असेल (Steering Duty) तेवढाच कर्तव्यकाळ त्यांच्या बाबतीत लक्षात घेण्यात येईल.

५) अधिग्रहित केलेल्या वाहनांच्या चालकांना त्यांच्या मूळ विभागातील/संस्थातील दराने मिळणारा अतिकालिक भत्ता आणि प्रत्येक तासाचा मूळ वेतनाच्या दराने मिळणारा अतिकालिक भत्ता यापैकी जो फायदेशीर असेल तो अतिकालिक भत्ता दिनांक २१ फेब्रुवारी, २००४ ते २५ मे, २००४ या कालावधीकरीता घेण्यास विकल्प राहील.

३. निवडणुकीच्या कालावधीत वाहनांचा वापर करणाऱ्या प्राधिकाऱ्यांनी वाहन चालकांनी केलेले काम प्रमाणित केले पाहिजे. ज्या प्रमाणपत्राच्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या स्वतःच्या वाहन चालकाप्रमाणेच इतर शासकीय विभागांकडून अधिग्रहित केलेल्या वाहनांच्या वाहन चालकांची अतिकालिक भत्त्याची देयके त्यांच्या मूळ विभागाकडे न पाठविता संबंधित वाहन चालकांना चुकती करावीत. तथापि, ज्या जिल्हाधिकारी कार्यालयांना इतर शासकीय विभागांच्या अधिग्रहित वाहनांच्या वाहन चालकांची अतिकालिक भत्त्याची देयके कामाच्या व्याप्तीमुळे चुकती करता येणे शक्य नसल्यास ही देयके संबंधीत शासकीय विभागाने/कार्यालयाने तयार करावीत व अशी तयार करण्यात आलेली देयके जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे "२०१५-निवडणुका-१०५ संसद निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च " ह्या लेखाशिर्षांतून खर्ची टाकण्यासाठी व प्रती स्वाक्षरी करण्यासाठी पाठवावीत. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून देयके प्रती

स्वाक्षरी करून परत आल्यावर संबंधित विभागांनी ती त्यांच्या कोषाधिकाऱ्याकडे सादर करावीत व वाहन चालकांना अतिकालिक भत्त्याची रक्कम त्वरित देण्याची व्यवस्था करावी.

४. यासाठी होणारा खर्च "२०१५-निवडणुका, उपशीर्ष १०५-संसदेच्या निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च, (००) (०१), संसदेच्या निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च, ०१-वेतन, संगणक सांकेतांक २०१५००५९ मागणी क्र. ए-२" या लेखाशीर्षाखालील सन २००४-२००५ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक:- २७८/२००४/सेवा-९, दिनांक १०.०६.२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( के. सूर्यकृष्णमूर्ती )
अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र शासन

प्रति,

1. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर,
2. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर,
3. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / वांद्रे,
4. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
5. सर्व विभागीय आयुक्त,
6. सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,
7. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
8. वित्त विभाग, सेवा-९,
9. सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१९/२६),
10. निवड नस्ती / अर्थसंकल्प शाखा.

Office of the Collector
Mumbai Suburban Dist.
22 JUN 2004
Election Branch
No. 5892

का. ५ का वि-३३५
२४/६/०४

C:\...\Marathi561

31|c

# सार्वत्रिक लोकसभा निवडणूक-२००४

## जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालयात वाहन चालकांनी केलेल्या अतिकालिक कामाची दैनंदिनी

**नांव :-**
**पदनाम :-**
**माहे एप्रिल-२००४ चे मुळ वेतन :- रु.**
**अतिकालिक भत्ता प्रती तास दर :- रु.**

| दिनांक | दिवस | कर्यालयीन कामाची वेळ | | अतिकालिक कामची वेळ | | एकुण अतिकालीक तास | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | पासुन | पर्यंत | | |
| २९/२/२००४ | रविवार (सुट्टी) | | | | | | |
| १/३/२००४ | सोमवार | | | | | | |
| २/३/२००४ | मंगळवार(सुट्टी) | | | | | | |
| ३/३/२००४ | बुधवार | | | | | | |
| ४/३/२००४ | गुरुवार | | | | | | |
| ५/३/२००४ | शुक्रवार | | | | | | |
| ६/३/२००४ | शनिवार | | | | | | |
| ७/३/२००४ | रविवार (सुट्टी) | | | | | | |
| ८/३/२००४ | सोमवार | | | | | | |
| ९/३/२००४ | मंगळवार | | | | | | |
| १०/३/२००४ | बुधवार | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११/३/२००४ | गुरुवार | | | | | | |
| १२/३/२००४ | शुक्रवार | | | | | | |
| १३/३/२००४ | शनिवार(सुट्टी) | | | | | | |
| १४/३/२००४ | रविवार (सुट्टी) | | | | | | |
| १५/३/२००४ | सोमवार | | | | | | |
| १६/३/२००४ | मंगळवार | | | | | | |
| १७/३/२००४ | बुधवार | | | | | | |
| १८/३/२००४ | गुरुवार | | | | | | |
| १९/३/२००४ | शुक्रवार | | | | | | |
| २०/३/२००४ | शनिवार | | | | | | |
| २१/३/२००४ | रविवार (सुट्टी) | | | | | | |
| २२/३/२००४ | सोमवार | | | | | | |
| २३/३/२००४ | मंगळवार | | | | | | |
| २४/३/२००४ | बुधवार | | | | | | |
| २५/३/२००४ | गुरुवार | | | | | | |
| २६/३/२००४ | शुक्रवार | | | | | | |
| २७/३/२००४ | शनिवार(सुट्टी) | | | | | | |
| २८/३/२००४ | रविवार (सुट्टी) | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २९/३/२००४ | सोमवार | | | | | | |
| ३०/३/२००४ | मंगळवार(सुट्टी) | | | | | | |
| ३१/३/२००४ | बुधवार | | | | | | |
| १/४/२००४ | गुरुवार | | | | | | |
| २/४/२००४ | शुक्रवार | | | | | | |
| ३/४/२००४ | शनिवार(सुट्टी) | | | | | | |
| ४/४/२००४ | रविवार (सुट्टी) | | | | | | |
| ५/४/२००४ | सोमवार | | | | | | |
| ६/४/२००४ | मंगळवार | | | | | | |
| ७/४/२००४ | बुधवार | | | | | | |
| ८/४/२००४ | गुरुवार | | | | | | |
| ९/४/२००४ | शुक्रवार(सुट्टी) | | | | | | |
| १०/४/२००४ | शनिवार(सुट्टी) | | | | | | |
| ११/४/२००४ | रविवार (सुट्टी) | | | | | | |
| १२/४/२००४ | सोमवार | | | | | | |
| १३/४/२००४ | मंगळवार | | | | | | |
| १४/४/२००४ | बुधवार(सुट्टी) | | | | | | |
| १५/४/२००४ | गुरुवार | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १६/४/२००४ | शुक्रवार | | | | | | |
| १७/४/२००४ | शनिवार | | | | | | |
| १८/४/२००४ | रविवार (सुट्टी) | | | | | | |
| १९/४/२००४ | सोमवार | | | | | | |
| २०/४/२००४ | मंगळवार | | | | | | |
| २१/४/२००४ | बुधवार | | | | | | |
| २२/४/२००४ | गुरुवार | | | | | | |
| २३/४/२००४ | शुक्रवार | | | | | | |
| २४/४/२००४ | शनिवार(सुट्टी) | | | | | | |
| २५/४/२००४ | रविवार (सुट्टी) | | | | | | |
| २६/४/२००४ | सोमवार | | | | | | |
| २७/४/२००४ | मंगळवार | | | | | | |
| २८/४/२००४ | बुधवार | | | | | | |
| २९/४/२००४ | गुरुवार | | | | | | |
| ३०/४/२००४ | शुक्रवार | | | | | | |
| १/५/२००४ | शनिवार(सुट्टी) | | | | | | |
| २/५/२००४ | रविवार (सुट्टी) | | | | | | |
| ३/५/२००४ | सोमवार(सुट्टी) | | | | | | |

३५|८

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४/५/२००४ | मंगळवार(सुट्टी) | | | | | | |
| ५/५/२००४ | बुधवार(सुट्टी) | | | | | | |
| ६/५/२००४ | गुरुवार | | | | | | |
| ७/५/२००४ | शुक्रवार | | | | | | |
| ८/५/२००४ | शनिवार(सुट्टी) | | | | | | |
| ९/५/२००४ | रविवार (सुट्टी) | | | | | | |
| १०/५/२००४ | सोमवार | | | | | | |
| ११/५/२००४ | मंगळवार | | | | | | |
| १२/५/२००४ | बुधवार | | | | | | |
| १३/५/२००४ | गुरुवार | | | | | | |
| १४/५/२००४ | शुक्रवार | | | | | | |
| १५/५/२००४ | शनिवार | | | | | | |
| १६/५/२००४ | रविवार (सुट्टी) | | | | | | |
| १७/५/२००४ | सोमवार | | | | | | |
| १८/५/२००४ | मंगळवार | | | | | | |
| १९/५/२००४ | बुधवार | | | | | | |
| २०/५/२००४ | गुरुवार | | | | | | |
| २१/५/२००४ | शुक्रवार | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २२/५/२००४ | शनिवार(सुट्टी) | | | | | | |
| २३/५/२००४ | रविवार (सुट्टी) | | | | | | |
| २४/५/२००४ | सोमवार | | | | | | |
| २५/५/२००४ | मंगळवार | | | | | | |

एकूण अतिकालिक तास :- आतिकालीक भत्याची देय रक्कम रु.

सही

(श्री.------------------------------)

## प्र मा ण प त्र

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री ________________________ वाहनचालक यांचा लोकसभा निवडणूक-२००४ कामी केलेल्या अतिकालीक कामाचा लॉगबुका प्रमाणे भत्याबाबतचा दावा (Claim) शासन निर्णय,साप्रवि क्र. शासन निर्णय क्र.ईएसटी-१२०४/प्र.क्र.२४४/०४/३३, दिनांक १६ जून, ———— २००४ मधील सूचना विचारात घेऊन तपासला असून तो बरोबर आहे.

(कार्यालयप्रमुख/ अधिकाऱ्यांचा हुद्दा व स्वाक्षरी )

क्र. साप्रवि/सामान्य/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, प्लॉट नं.१,
तळमजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई-४०० ०१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र.४३६ दिनांक ८.१०.२००४.

(सामान्य आदेश क्र.२० (क) दि.१७.६.६३ शी संलग्न)

विषय : वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती देयकातून अधिभार (Surcharge) न वगळणेबाबत.

---

स.सा.आ.क्र.२०(क) दि.१७.६.६३ मध्ये विहित केलेल्या गंभीर आजार/शस्त्रक्रियासाठी कर्मचाऱ्यांनी मागणी केलेल्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणी त्यांनी सादर केलेल्या देयकामध्ये काही रुग्णालयामार्फत इतर एकूण खर्चाव्यतिरिक्त सरचार्ज (अधिभार) वेगळा लावण्यात येतो. मध्यंतरीच्या काळात असा सरचार्ज प्रतिपूर्तीसाठी ग्राह्य धरु नये असा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, त्याचवेळी उपरोक्त प्रकरणी महाराष्ट्र शासनाकडे सदर बाबतीमध्ये त्यांच्याकडे काय पध्दती अवलंबिलेली आहे याची विचारणा केली होती.

२. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने असे कळविले आहे की, "शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय प्रतीपूर्ती प्रकरणी रुग्णालयाने देयकामध्ये दर्शविलेला सरचार्ज हा त्या देयकाचाच एक भाग असल्याने शासकीय कर्मचाऱ्यांना त्याबाबतची प्रतिपूर्ती मंजूर करण्यात येते.''

३. त्या अनुषंगाने मंडळाच्या अध्यक्षांच्या मंजुरीने असा निर्णय झाला आहे की, दि.१.८.२००४ पासून मंडळ कर्मचाऱ्यांना सुध्दा वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकातील अधिभार (Surcharge) देय राहील.

(स्वाक्षरी) ५/१०/०४

संचालक (कर्मचारीवर्ग)

प्रत,
प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना

Surcharge-13

GAD/VI/RC/F.No.323
Maharashtra Stae Electricity Board
Estrella Batteries Expansion Building,
Ground Floor, Dharavi Road,
Matunga, Mumbai – 400 019

***ADMINISTRATIVE CIRCULAR NO. 437 DATE 14/10/2004***

Sub : Filling in the vacant posts of Vehicle Driver by Departmental promotion.

......

The instructions were issued vide letter No.DOP/RC/12455 dated 19/3/1999 (sent through Fax) that the vacant posts of Vehicle Driver and Vehicle Cleaner should be filled in only with prior approval of Head Office giving detailed justification.

2. Consequent on issue of the above instructions, number of proposals are being received in Head Office seeking permission to fill in the vacancies of Vehicle Driver. The Chief Engineers and field Officers have also expressed their difficulties and need for filling in the vacancies of Vehicle Driver in the interest of work.

3. In view of the above, the issue has been examined and it has been decided to allow to fill in the vacancies of Vehicle Driver by Departmental promotion subject to the following conditions :-

a) The posts of Vehicle Driver wherever should be filled in only by way of departmental promotions from amongst the qualified Vehicle Cleaners only.

b) The posts of Vehicle Drivers are to be filled in only to the extent of availability of vehicles on road.

c) Before considering departmental promotions, it should be ensured that no Driver is sitting idle /surplus in the Zone. The clearance to this effect from the Chief Engineer concerned should be obtained before taking departmental selections.

d) While filling in vacancies, the first priority should be given for wiping out the backlog of Backward classes.

e) The Trade test/Driving test should be taken before placing the cases before the C.S.C.

f) The resultant posts of Vehicle Cleaners should not be filled in. The work should be managed /got done through Supernumerary Helpers.

4. The above conditions should be followed scrupulously.

5. This Circular is issued with the approval of the Chairman.

*(S.Y.Patil)*
*Director of Personnel.*

To

All as per the mailing list upto the level of Ex.Engr. in H.O. and field .

सा.प्रवि/गट-८(रचका)/न.क्र.२८३-ऐ
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा
मुंबई - ४०००१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र.४३८ दिनांक १८/१०/२००४

***विषय*** : स. सा. आदेश ७४ दि.३०.४.७४ अनुसार उच्च वेतनश्रेणीचा लाभ मिळालेल्या टंकलेखकांना वरिष्ठ टंकलेखक या पदाच्या पदोन्नतीसाठी ५० श.प्र.मि.इंग्रजी टंकलेखन गती चाचणी उत्तीर्ण करण्यापासून सूट मिळणेबाबत.

.......

स.सा.आदेश क्र.७४ दि.३०.४.७४ अन्वये वरिष्ठ व प्रमुख टंकलेखक या पदांचा प्रथम व द्वितीय लाभ मंजूर झालेल्या ज्या टंकलेखकांनी ५० श.प्र.मि.इंग्रजी टंकलेखनाची शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही अशा टंकलेखकांना वरिष्ठ टंकलेखक या पदाच्या पदोन्नतीसाठी पात्र ठरविता येईल किंवा कसे, अशी काही कार्यालयामार्फत विचारणा करण्यात आली होती.

२. याबाबत असा खुलासा करण्यात येत आहे की स.सा.आ.७४ दि.३०.४.७४ अन्वये टंकलेखकांना वरिष्ठ टंकलेखक या पदाच्या उच्च वेतनश्रेणीचा लाभ देताना ज्या टंकलेखकांनी वाणिज्यिक परीक्षा (G.C.C.Exam) उत्तीर्ण केलेली नसेल त्यांची ५० श.प्र.मि.इंग्रजी टंकलेखनाची मंडळामार्फत गती चाचणी घेण्यात येते. या चाचणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या टंकलेखकांनाच अर्हताप्राप्त ग्राह्य धरले जाते आणि पदोन्नतीयोग्य समजून विहित पध्दतीनुसार वरिष्ठ टंकलेखक या पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ दिला जातो.

३. सबब, वाणिज्यिक प्रमाणपत्र धारण न केलेल्या ज्या कर्मचा-यांना, मंडळातर्फे घेण्यात आलेली गती चाचणी उत्तीर्ण केल्यामुळे स.सा.आदेश ७४ दि.३०.४.७४ अनुसार उच्च वेतनश्रेणीचा प्रथम व द्वितीय लाभ मंजूर झाला आहे, अशा टंकलेखकांच्या पदोन्नतीसाठी पुन्हा गतीचाचणी घेण्याची आवश्यकता नाही.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक सचिव यांनी दिलेल्या मंजुरीनुसार प्रसृत करण्यात येत आहे.

(सही)
संचालक (कर्मचारीवर्ग)

प्रत :
प्रेषण यादीप्रमाणे.

E/F.N.283-3

क्र.साप्रवि/गट-८(रवका)/न.क्र.८८७
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा
मुंबई - ४०००१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र.४३९ दि.१८/१०/२००४

***विषय*** : महाराष्ट्र माहितीचा अधिनियम - २००२

***वाचा*** : १) प्रशासकीय परिपत्रक क्र.३७४ दि.१९.१२.२००२
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.४१४ दि.१२.३.२००४

.......

``महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश २००२`` आणि ``महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००२`` अनुक्रमे प्रशासकीय परिपत्रक क्र.३७४ दि.१९.१२.२००२ व प्रशासकीय परिपत्रक क्र.४१४ दि.१२.३.२००४ अन्वये मंडळाच्या संबंधीत कार्यालयांनी करावयाच्या कार्यवाहीसाठी या अगोदरच प्रसृत करण्यात आले आहेत.

२. आता शासनाने परिपत्रक क्र.ममाअ-२००२/प्र.क्र.१२७/०२/५ दि.२४.६.२००४ व ममाअ-२००४/प्र.क्र.३४/४/५ अन्वये दि.६.७.२००४ अन्वये उपरोक्त विषयासंबंधात या अगोदर दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावयाचे आदेश दिले आहेत व काही नवीन महत्वाच्या सूचना निर्गमित केल्या आहेत, जसे की

१) सर्व सक्षम प्राधिका-यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील प्रत्येक कार्यालयाकरीता शासकीय माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या तात्काळ नियुक्त्या करणे.

२) प्रत्येक कार्यालयातील शासकीय माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक इ.बाबतची माहिती कार्यालयाच्या दर्शनी भागावर तात्काळ प्रसिध्द करणे.

३) अपिलीय प्राधिकारी यांनी अधिनियमात दिलेल्या तरतुदीप्रमाणे निश्चित कालमर्यादेत अपील निकाली काढणे.

४) अधिनियमातील कलम चार मध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे प्रत्येक कार्यालयातील अभिलेख तालिकाबद्ध सूचिबद्ध करणे, कार्यालयातील अधिकारी यांची कर्तव्य आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत त्यांनी अनुसरावयाची

कार्यपद्धती, नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांच्या तपशील इत्यादी कार्यवाही तात्काळ करणे.

५) सर्व माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जांची व अपिलांची प्रत्येक महिन्याची क्रमवार माहिती, विवरण पत्र `अ` व `ब` मध्ये संबंधीत जिल्हाधिकारी यांच्याकडे दर महिन्याच्या ५ तारखेपूर्वी पाठविणे इत्यादि.

३. शासनाचे परिपत्रक दि.२२.६.२००४,दि.२४.६.२००४ व दि.६.७.२००४ ची प्रत माहिती, मार्गदर्शन आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की त्यांनी उपरोक्त परिपत्रकातील सूचना लक्षात घ्याव्या आणि त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी. मंडळाच्या माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आलेल्या विवरण पत्र अ व ब ची प्रत मुख्य कार्यालयातील मुख्य माहिती व जनसंपर्क अधिकारी जे नोडल ऑफीसर म्हणून काम पहात आहेत त्यांना देखील देण्यात यावी.

४. सदर परिपत्रक सचिवांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

**( सु.य. पाटील )**
**संचालक (कर्मचारीवर्ग)**

प्रत :
सर्व उप विभागीय कार्यालयांना
प्रेषण यादीप्रमाणे.

E/F.N.887

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२
अंतर्गत उद्भवणा-या शंकांचे निरसन/स्पष्टीकरण.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्र.ममाअ-२००४/प्र.क्र.६६/०४/५,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक २२.६.२००४

**परिपत्रक:-**

शासनाचा कारभार पारदर्शक असावा व शासनाच्या कारभाराची जनतेला जास्तीत जास्त माहिती मिळावी या हेतूने शासनाने महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ पारित केलेला आहे. सदर अधिनियमातील तरतुदींमध्ये काही संदिग्धता असल्याबाबत अनेक स्तरावरुन शासनाकडे तक्रारी करण्यात येत होत्या. मा.लोकआयुक्त/उप लोक आयुक्त यांनीसुध्दा शासनाकडे काही मुद्यांबाबत खुलासा करण्याची विनंती केली होती. वर नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील संदिग्धते संदर्भात खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे:-

| क्र. | मुद्या | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | द्वितीय अपीलीय प्राधिकारी म्हणून मा.लोकआयुक्त व यथाशक्ती मा. उप लोकआयुक्त यांनी दिलेला निर्णय बंधनकारक आहे काय? | मा.लोकआयुक्त वा यथास्थिती मा. उप लोकआयुक्त यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ संदर्भात द्वितीय अपीलीय प्राधिकारी म्हणून दिलेले निर्णय हे संबंधितांवर बंधनकारक व अंतिम ठरतात आणि त्यांचे यथोचित पालन करणे आवश्यक आहे. |
| २ | महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ कशा प्रकारच्या सार्वजनिक संस्थांना लागू आहे. | अधिनियमातील कलम २(६) मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या संस्थांना शासनाकडून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणतेही सहाय्य देण्यात येते, त्यांना हा कायदा लागू असून त्या संस्थांची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता त्या संस्थांनी शासकीय माहिती अधिकारी/अपीलीय प्राधिकारी नेमणे आवश्यक आहे. सदर संस्थांशिवाय ज्या संस्था धर्मादाय आयुक्त/निबंधक यांचेकडे नोंदणीकृत आहेत अशा संस्थांना स्वतंत्रपणे शासकीय माहिती अधिकारी/अपीलीय प्राधिकारी यांच्या नेमणूका करण्याची आवश्यकता नाही. अशा संस्थांसंबधींची माहिती (जी धर्मादाय आयुक्तांच्या/निबंधकांच्या कार्यालयात उपलब्ध असते ती) धर्मादाय आयुक्त/निबंधक यांनी त्यांच्या कार्यालयाकरिता नियुक्त केलेल्या शासकीय माहिती अधिकारी/अपीलीय प्राधिकारी यांच्याकडून मिळविता येते. |
| ३ | शासकीय माहिती अधिका-याने माहिती देण्यामध्ये केलेल्या कसुरीबद्दल त्याला मदत करणा-या अधिकारी/ कर्मचा-याला दंडाची शिक्षा करता येते काय? | "महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२" च्या कलम २(७) मध्ये शासकीय माहिती अधिका-यांची व्याख्या देण्यात आली आहे. त्यानुसार या अधिनियमाखाली आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी शासकीय माहिती अधिका-याकडून ज्याचे सहाय्य घेतले जाते अशा अधिका-यास किंवा कर्मचा-यासुध्दा शासकीय माहिती अधिकारी समजण्यात येते. ही तरतूद लक्षात घेता, शासकीय माहिती अधिका-याने माहिती देण्यामध्ये |

C:\Om(1)\Adm\Adm-2L(5588)b

| | | |
|---|---|---|
| | | केलेल्या कसुरीबद्दल त्याला मदत करणारा अधिकारी/कर्मचारी ज्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास दिरंगाई/विलंब केला असेल तो शिक्षेस पात्र राहील. |
| ४ | कोणत्याही शासकीय माहिती अधिका-याने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्यास कोणत्याही योग्य कारणाशिवाय कसूर केली असेल किंवा चुकीची, दिशाभूल करणारी सदोष किंवा अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिल्यास संबंधित शासकीय माहिती अधिका-यावर शास्ती लादता येईल. अशी तरतूद अधिनियमातील कलम १२ मध्ये करण्यात आलेली आहे. त्यामध्ये कसुरवार अधिका-यावर शास्ती लादण्याची कार्यवाही ही संबंधित सक्षम अधिका-याच्या स्वेच्छा निर्णयानुसार आहे काय? | कोणत्याही शासकीय माहिती अधिका-याने विहित मुदतीत कोणतेही योग्य कारण नसताना माहिती उपलब्ध करुन देण्यात कसूर केली असेल किंवा चुकीची दिशाभूल करणारी सदोष किंवा अपूर्ण माहिती दिली आहे या निर्णयापर्यंत जर सक्षम प्राधिकारी आला असेल तर अशा शासकीय माहिती अधिका-यावर शास्ती लादणे ही बाब अधिनियमातील कलम १२ मधील तरतुदीनुसार स्वेच्छानिर्णयाधीन नसून ती बंधनकारक आहे. इंग्रजी भाषांतरामध्ये याबाबत जरी "May" असा शब्द वापरण्यात आला असला तरी वस्तुत तो "Shall" याच अर्थाने वापरण्यात आला आहे. |

"महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२" ची अंमलबजावणी करतेवेळी उपरोक्त बाबीसंदर्भात दिलेले स्पष्टीकरण विचारात घेऊन संबंधितांनी योग्य ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(यु.पी.एस.मदान)
शासनाचे सचिव.

प्रत:-

मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र.ममाअ-२००२/प्र.क्र.१२७/०२/५.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-२४.६.२००४

पहा:- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. ममाअ-२००२/प्र.क्र.९६/०२/५, दि.३०.९.२००२.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. ममाअ-२००२/प्र.क्र.१३२/०२/५, दि.७.१.२००३
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. ममाअ-२००२/प्र.क्र.१२७/०२/५, दि.१४.८.२००३
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. ममाअ-२००२/प्र.क्र.१२७/०२/५, दि.३१.१०.२००३
५) मा.मुख्य सचिव यांनी सर्व मंत्रालयीन विभागाच्या सचिव/प्रधान सचिव व अपर मुख्य सचिव यांना लिहिलेले दिनांक ३ डिसेंबर, २००४ चे अर्ध शासकीय पत्र.
६) मा. मुख्य सचिव यांनी सर्व मंत्रालयीन विभागाच्या सचिव/प्रधान सचिव व अपर मुख्य सचिव यांना लिहिलेले दिनांक २५ मे, २००४ चे अर्ध शासकीय पत्र.

**शासन परिपत्रक:-**

शासकीय व्यवहारांची/कामकाजाची जास्तीत जास्त माहिती जनतेस मिळावी याकरिता दि.२३ सप्टेंबर, २००२ पासून "महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश, २००२" जारी करण्यात आला होता. या अध्यादेशाच्या अनुषंगाने मा.राष्ट्रपती यांनी मान्यता घेऊन "महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२" पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक २३ सप्टेंबर, २००२ पासून अंमलात आणण्यात आलेला आहे.

२. या अधिनियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याकरिता प्रत्येक सक्षम प्राधिकाऱ्याने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत उपरोक्त आदेशान्वये संबंधितांना वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत:-

अ) सर्व सक्षम प्राधिका-यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील प्रत्येक कार्यालयाकरिता शासकीय माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांच्या तात्काळ नियुक्त्या करणे.

ब) प्रत्येक कार्यालयातील शासकीय माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांचे नांव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक इत्यादी बाबतची माहिती कार्यालयाच्या दर्शनी भागावर तत्काळ प्रसिध्द करणे.

क) अधिनियमातील कलम चार मध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे प्रत्येक कार्यालयातील अभिलेख तालिकाबध्द व सूचिबध्द करणे, कार्यालयातील अधिकारी यांची कर्तव्ये आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत त्यांनी अनुसरावयाची कार्यपध्दती, नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांचा तपशील इत्यादी कार्यवाही तात्काळ करणे.

ड) प्रत्येक सक्षम प्राधिका-यांच्या नियंत्रणाखालील शासकीय माहिती अधिका-याकडे प्राप्त झालेल्या अर्जांवरील कार्यवाहीची माहिती उपरोल्लेखित संदर्भ ४ येथील शासन परिपत्रक दिनांक ३१ ऑक्टोबर, २००३ अन्वये विहित केलेल्या विवरणपत्र "अ" मध्ये तसेच अपीलीय प्राधिका-याकडे प्राप्त झालेल्या अपीलांवरील कार्यवाहीची माहिती विवरणपत्र "ब" मध्ये संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी सादर करणे. तसेच क्षेत्रिय कार्यालयांकडून विवरणपत्र "अ" व "ब" मध्ये प्राप्त झालेली माहिती एकत्रित करुन विवरणपत्र "क" मध्ये दर महिन्याच्या १५ तारखेपूर्वी सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविणे.

३. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता उपरोक्त बाबींवर संबंधितांनी विनाविलंबाने कार्यवाही करणे अपेक्षित होते. तथापि, काही कार्यालयांनी शासकीय माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांच्या अद्यापही नेमणुका केल्या नसल्याची, ब-याच विभागांनी/कार्यालयांनी त्यांच्या विभागात/कार्यालयात नियुक्त केलेल्या शासकीय माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांच्या

...याची माहिती कार्यालयाच्या दर्शनी भागावर प्रसिध्द केली नसल्याची व अद्याप कोणत्याही विभागांनी/ कार्यालयांनी अधिनियमातील कलम चार मध्ये नमूद केलेली कार्यवाही केली नसल्याची बाब काही स्वयंसेवी संस्थांनी मा. मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणली असून त्यावर मा.मुख्यमंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.

४. वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या "अ", "ब", "क" व "ड" येथील मुद्यांबाबतची माहिती तातडीने पूर्ण करण्याबाबत संबंधितांना उपरोक्त नमूद शासन परिपत्रकान्वये वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, संबंधितांनी या शासन परिपत्रकांची योग्य ती दखल घेतली नसल्याचे दिसून येते. तेव्हा ज्या विभागांनी/ कार्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत १५ दिवसांच्या आत पूर्ण करावी. तसेच "ड" च्या संदर्भात दि.३१.१० .००३ च्या शासन परिपत्रकामध्ये नमूद कार्यपध्दतीमध्ये आता पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत:-

१) सर्व शासकीय माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या अनुक्रमे अर्जांची व अपीलांची प्रत्येक महिन्याची माहिती विवरणपत्र "अ" व "ब" मध्ये संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी पाठविण्याची दक्षता घ्यावी.

२) संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे विविध कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे दरमहा होणा-या लोकशाही दिनावेळी सर्व जिल्हाधिकारी यांनी या अधिनियमाच्या अंमलबजावणीचा आढावा घ्यावा व त्यांचेकडे प्राप्त झालेली सर्व माहिती एका आठवडयाच्या आत संबंधित विभागीय आयुक्त यांचेकडे पाठवावी.

३) सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून विभागीय आयुक्त यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेली सर्व माहिती विवरणपत्र "क" मध्ये एकत्रित करून एका आठवडयाच्या आत शासनास (सामान्य प्रशासन विभाग) सादर करावी.

४) सर्व मंत्रालयीन विभागांनी मंत्रालय स्तराकरिता नियुक्त केलेल्या सर्व शासकीय माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या अनुक्रमे अर्जांची व अपीलांची प्रत्येक महिन्याची माहिती विवरणपत्र "क" मध्ये एकत्रित करून सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावी.

उपरोक्त नमूद सुधारित कार्यवाही करण्याकरिता दि.३१.१०.२००३ सोबतच्या विवरणपत्रामध्ये सुधारणा करण्यात आली असून सुधारित विवरणपत्राची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. तरी या पुढे (जुलै २००४ ची माहिती) प्रस्तुत बाबींची माहिती सुधारित विवरणपत्रात पाठवावी.

५. प्रथम अपीलीय प्राधिका-याकडे प्राप्त होणा-या अपीलांवर विहित मुदतीच्या आत निर्णय घेऊन तो अपीलकारास लेखी कळविण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्र. ६ च्या अ.शा.पत्रान्वये सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात आली असून त्यानुसार सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व संबंधितांना या प्रकरणी आवश्यक त्या सूचना तात्काळ द्याव्यात यासाठी पुन्हा स्मरण करण्यात येत आहे.

६. सर्व विभागीय आयुक्तांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व कार्यालयातील या अधिनियमाच्या अंमलबजावणीचा आढावा दर दोन महिन्यांनी घ्यावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-

(यु.पी.एस.मदान)

शासनाचे सचिव.

सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. ममाअ-२००२/प्र.क्र.१२७/०२/५, दि.३१.१०.२००३ च्या सोबतच्या विवरणपत्रांमध्ये सुधारित विवरणपत्र.

## विवरणपत्र "अ"

शासकीय माहिती अधिका-यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे दरमहा दि. ५ पूर्वी सादर करावयाची माहिती.

माहितीचा कालावधी:- दिनांक ते दिनांक

| शासकीय माहिती अधिका-याचे नाव, पदनाम व कार्यालयाचे नांव | माहितीच्या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या | त्यापैकी निकालात काढलेल्या अर्जांची संख्या | प्रलंबित अर्जांची संख्या व त्यांची संक्षिप्त कारणे | ३० दिवसांपेक्षा जास्त दिवसांपासून प्रलंबित अर्जांची संख्या व त्याची कारणे. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

## विवरणपत्र "ब"

सर्व अपीलीय प्राधिका-यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे दरमहा दि. ५ पूर्वी सादर करावयाची माहिती

माहितीचा कालावधी:- दिनांक ते दिनांक

| अपीलीय प्राधिका-याचे नाव, पदनाम व कार्यालयाचे नांव | प्राप्त झालेल्या अपील अर्जांची संख्या | त्यापैकी निकालात काढण्यात आलेल्या अपील अर्जांची संख्या | प्रलंबित अपील अर्जांची संख्या व त्यांची संक्षिप्त कारणे. | ६० दिवसांपेक्षा जास्त दिवसांपासून प्रलंबित अपीलांची संख्या व त्याची कारणे. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

## विवरणपत्र "क"

प्रत्येक विभागीय आयुक्त व सर्व मंत्रालयीन विभागांनी सामान्य प्रशासन विभागाकडे एकत्रित करुन दरमहा दि. १५ पूर्वी पाठवावयाची माहिती.

कार्यालयाचे/विभागाचे नांव:-

माहितीचा कालावधी:- दिनांक ते दिनांक

| एकूण कार्यालयांची संख्या | एकूण सक्षम प्राधिका-यांची संख्या | एकूण शासकीय माहिती अधिका-यांची संख्या | | | | एकूण अपीलीय प्राधिका-यांची संख्या. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त झालेले एकूण अर्ज | निकाली काढलेले अर्ज | प्रलंबित अर्ज | ३० दिवसांपेक्षा जास्त दिवसांपासून प्रलंबित अर्जांची संख्या व त्याची कारणे. | प्राप्त झालेले एकूण अपील अर्ज | निकाली काढलेले अपील | प्रलंबित अपील अर्ज | ६० दिवसांपेक्षा जास्त दिवसांपासून प्रलंबित अपीलांची संख्या व त्याची कारणे. |
| | | | | | | | | | |

C:\Om(1)\Adm\Adm-2Table(5..d)B

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२
प्रथम अपीलीय प्राधिका-याने अपील विहित मुदतीत निकाली काढणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र:ममाअ-२००४/प्र.क्र.३४/०४/५.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-६ जुलै, २००४

परिपत्रक:-

"महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२" च्या कलम ११(४) अन्वये अपीलीय प्राधिकारी यांनी शक्यतो ३० दिवसांच्या आत किंवा वेळ वाढवून घेतली असेल तर ६० दिवसांच्या आत त्यांच्याकडे दाखल झालेल्या अपिलावर निर्णय देणे अभिप्रेत आहे. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपीलीय प्राधिकारी हे निश्चित कालावधीत निर्णय देत नाहीत. त्यांच्याकडून निर्णय झाला नसल्यामुळे अर्जदारांना माहिती उपलब्ध होत नाही व त्यांना मा.लोक आयुक्त/उप लोक आयुक्त यांच्याकडे पुढील अपिल दाखल करणेही शक्य होत नाही. अशा परिस्थितीत माहितीचा अधिकार-अधिनियमाचा मूळ हेतू साध्य होत नाही. शासनाकडे विविध अर्जदारांकडून आणि सेवाभावी संस्थाकडून अशाप्रकारच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या अगोदर मुख्य सचिव यांच्या सहीने सर्व मंत्रालयीन विभागांना /विभाग प्रमुखांना अपीलीय प्राधिका-यांमार्फत वेळेवर निर्णय घेण्यासंबंधी दि.२५.५.२००४ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये सूचना देण्यात आल्या होत्या. त्या सूचनांची अंमलबजावणी अजूनही झालेली दिसत नाही.

वरील परिस्थितीचा विचार करुन आता असे आदेश देण्यात येत आहेत की, सर्व अपीलीय प्राधिकारी यांनी अधिनियमांत दिलेल्या तरतूदीप्रमाणे निश्चित कालमर्यादेत अपील निकाली काढावे. यासंदर्भात केलेल्या दिरंगाईची शासनाकडून गंभीरपणे दखल घेतली जाईल. अपील निकाली काढणे ही बाब अपीलीय प्राधिका-यांच्या निर्धारीत केलेल्या कामाचा भाग असून यात केलेली कसूर ही त्यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडण्यात केलेली कसूर समजण्यात येईल आणि असे अधिकारी नियमाप्रमाणे कारवाईस पात्र राहतील याची नोंद घ्यावी व दक्षता बाळगावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(अरुणकुमार मागो)
शासनाचे मुख्य सचिव.

प्रत:-

मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग

C:\On(1)\Adm\Adm-21(5588)b

GAD/VIII(O&M)/F.No.357
Maharashtra State Electricity Board
Estrella Batteries Expn.Building
Ground floor, Dharavi Road
Matunga, Mumbai – 400 019.

***ADMINISTRATIVE CIRCULAR NO. 440 DATE 18/10/2004***

Sub : Promotion channel to the Artisans in Distribution cadre (T&D)III-B Maintenance Wing and grant of higher grade benefit under G.O.74 dated 30/4/1974.

.....

The Distribution cadre (T&D) III comprising of Artisans indicated in Annexure-I appended to the MSEB Employees' Seniority Regulations, 1961 is as under :-

**Distribution cadre (T&D) III**
(Receiving Stations & Sub-Stations)

(B) Maintenance wing
(Elect/Mech/Testing)

1. Head Foreman
2. Artisan 'A' (Sub-station)
3. Artisan 'B' (Sub-station)
4. Artisan 'C' (Sub-station)
5. Artisan 'D' (Sub-station)
6. Helper

2. The services of Artisans working in Receiving Stations/Sub-stations and Testing Divisions under EHV O&M Circle are transferable from Testing Divisions to EHV Receiving Stations/Sub-Stations and vice-versa. Likewise, the Artisans working at Receiving Stations/sub-Stations under Urban Zone are also transferable to Meter Testing Units/Meter Testing Bench on Distribution side and vice-versa. However, the word 'Sub-station' indicated in the bracket in the cadre is creating impression that such of the Artisans 'A' working in Sub-stations are only eligible for further promotion to the post of Head Foreman and also higher grade benefit of the post of Head Foreman i.e. Rs.5290-210-6340-225-8590-250-12090 under G.O.74 dated 30/4/1974. The Artisans 'A' working at other places viz. Testing Dns./Testing Units/Benches are, therefore, being treated as having no channel of promotion and higher grade benefit in the pay scale of Rs.4665-185-5590-210-7690-225-11515 is being granted to them.

3. In view of the above, there is no uniformity while granting the higher grade benefits to the Artisan 'A'. The issue has, therefore, been examined and now the Board under its Resolution No.225 dated 22/9/2004 has accorded approval to delete the word 'Sub-station' appearing in bracket of each category of Artisan appearing under Distribution cadre (T&D)III-(B) Maintenance Wing (Electrical/Mechanical/ Testing) indicatd in the Annexure-I appended to the MSEB Employees' Seniority Regulations,1961 [C.S.No.45 dated 17/3/1993 to G.O.14(P) dated 11/4/1963]. Accordingly, C.S.No. 64 dated 18/10/2004 to G.O.14(P) dated 11/4/1963 has been issued.

4. Consequently, all Artisans 'A' in Electrical/Mechanical/Testing Wing irrespective of their place of working on T&D side shall be eligible for promotion to the post of Head Foreman and also higher grade benefit of the post of Head Foreman, if they could not get promotion for no fault of their own for want of clear vacancies; under the provisions of G.O.74 dated 30/4/1974.

5. The Board has further accorded approval to review the higher grade benefit granted either on 1st occasion or on 2nd occasion as the case may be to the Artisan 'A' working in Electrical, Mechanical & Testing Wing of T&D side and extend the benefit of higher grade benefit of the post of Head Foreman w.e.f. 17/3/1993 to remove the anomaly in grant of higher grade benefit. However, the Artisans 'A' working in Distribution Cadre (T&D)IV/Civil-II which comprises Workshop Turner, Fitter, Carpenter, Sub-overseer Gr.I etc. trades shall continue to be granted higher grade benefit of the pay scale of Rs.4665-185-5590-210-7690-225-11515 as notified under C.S.No.11 dated 14/10/1984 to G.O.74 dated 30/4/1974 as they are not having channel of promotion.

6. In view of the above, all Competent Authorities are requested to take expeditious action to review the higher grade benefit(s) granted on 1st and 2nd occasion as the case may be in respect of Artisans 'A' working in Electrical/Mechanical/Testing Wings of T&D side in the past.

*(S.Y.Patil)*
***Director of Personnel***

To

All as per mailing list.

—

क्र. साप्रवि/मावक/विभमो/
महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई- ४०००१९.

**प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ४४१ दिनांक ६-११-२००४**

विषय : मागासवर्गीयांचा सरळ सेवा भरती तसेच पदोन्नतीमधील अनुशेष भरून काढण्याबाबत- तिमाही माहिती सादर करणेबाबत.

संदर्भ : १) मंडळाचे प्रशासकीय परिपत्रक क्र. ३१७, दि. १५-१-२००३
२) मंडळाचे प्रशासकीय परिपत्रक क्र. ३८९, दि. २१-५-२००३
३) मुख्य कार्या.परि.क्र.साप्रवि/मावक/विभमो/१५१७, दि.१२-६-०३
४) मुख्य कार्या.परि.क्र.साप्रवि/मावक/विभमो/२२५०, दि.१८-८-०३
५) मुख्य कार्या.परि.क्र.साप्रवि/मावक/विभमो/३०९२, दि.४-१२-०३

---

महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळातील वेतनगट १ व २ मधील सरळ सेवा भरतीने भरावयाची पदे आणि पदोन्नतीमधील सर्व वेतनगटातील मागासवर्गीयांचा अनुशेष दिनांक ३१-१२-२००२ अखेर आणि वेतनगट ३ व ४ मधील सरळ सेवेने भरावयाची पदे विद्युत नियामक आयोगाच्या अटीच्या अधीन राहून विशेष भरती मोहिमेंतर्गत भरण्यास दिनांक ३१-१२-२००३ पर्यंत वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली होती. दिनांक ३१-१२-२००३ पर्यंत दिलेली शेवटची मुदतवाढ संदर्भ क्र.५ अन्वये सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांना कळविण्यात आली होती.

२. अनुशेष भरून काढण्यासाठी वेळोवेळी वाढवून दिलेली मुदत संपलेली असली तरी अनुशेषाची रिक्त पदे भरणे नियुक्ती अधिकाऱ्यांवर बंधकारक राहील असे शासनाने परिपत्रक क्रमांक बीसीसी-२००२/१३०६/१६-ब, दिनांक १७-५-२००४ अन्वये आदेश दिलेले आहेत. तसेच सदर पदे भरण्याची प्रक्रिया स्थगित करण्यात आलेली नसून आस्थापनेवरील मागासवर्गीयांचा अनुशेष जोपर्यंत पूर्णतः भरण्यात येत नाही, तोपर्यंत भरती प्रक्रिया सातत्याने सुरु ठेवावयाची आहे.

३. अनुशेष भरून काढण्यासाठी वाढवून दिलेली मुदत संपली असली तरी, अनुशेषाची रिक्त पदे भरणे बंधनकारक आहे, असा शासनाने वरीलप्रमाणे खुलासा केला असला तरी मध्यंतरीचे काळात विद्युत अधिनियम २००३ मधील अनिवार्य (Mandatory) तरतुदी, दिनांक १०-६-२००३ पासून लागू झाल्यामुळे विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदीनुसार भविष्यात महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाचे होऊ घातलेले विभाजन / पुनर्रचना विचारात घेऊन तसेच विद्युत नियामक अयोगाने मनुष्यबळ जादा असल्याचे नोंदविलेले अभिप्राय विचारात घेवून सुधारित आकृतिबंध ( Norms ) ठरवून कर्मचारीवृंदाचे पुनर्विलोकन ( Staff Review ) करून

कर्मचारीवर्गाचा आढावा घेण्यासाठी वरिष्ठ पातळीवर पारेषण व वितरण आणि विद्युत निर्मिती, या विभागांसाठी समितीचे गठन करण्यात आलेले आहे व त्यांचा अहवाल प्राप्त झाला असून मंडळाने तत्वतः (In Principle) मान्य केलेला आहे. तथापि, सदर उच्चाधिकार समितीच्या अहवालावर कामगार संघटनांशी चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात यावा असे मंडळाने सूचित केलेले आहे. तसेच सुधारित आकृतिबंधानुसार ज्या संवर्गात कर्मचा-यांची उणीव (Deficit) आहे अशी पदे भरता येतील. सदर अहवालाचे अवलोकन केले असता ब-याच प्रवर्गामध्ये मोठया प्रमाणात अतिरिक्त पदे आढळून आली आहेत. त्यामुळे ज्या प्रवर्गामध्ये अतिरिक्त पदे जास्त आहेत आणि अतिरिक्त ठरलेल्या कर्मचा-यांचे समायोजन केल्यानंतर उपलब्ध होण्या-या रिक्त पदांचा आढावा अंतिम होईपर्यंत सेवाभरतीने पदे भरावयाची नाहीत असा मंडळाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे".

४. मंडळाच्या उपरोक्त धोरणात्मक निर्णयाच्या अधीन राहून मागासवर्गीयांच्या सरळ सेवा व पदोन्नतीमधील अनुशेषांतर्गत भरण्यात आलेल्या पदांचा एकत्रित अनुपालन अहवाल शासनास प्रत्येक तीन महिन्यानंतरचा म्हणजेच मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर अखेर त्याच्या पुढच्या महिन्यातील पहिल्या आठवडयात सादर करावयाचा असल्याने परिमंडलांनी/विद्युत केंद्रांनी त्यांचे स्तरावर संकलित केलेला एकत्रित अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्रात आस्थापना अधिकारी (मावक) यांचेकडे प्रत्येक ३ महिन्यानंतरच्या पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत माहितीची जाण असणा-या सहायकामार्फत पाठवावा.

५. सरळ सेवेची माहिती व पदोन्नतीची माहिती स्वतंत्र प्रपत्रात आणि वेतनगट निहाय असावी. शिवाय अनुशेषांतर्गत भरण्यात आलेल्या पदाची माहिती ही कार्यालय निहाय (नियुक्ती अधिका-याच्या स्तरावरील) प्रत्येक कार्यालयाची स्वतंत्र असावी. या व्यतिरिक्त परिमंडल स्तरावरील पदनिहाय माहितीचा गोषवारा (Consolidation) शेवटी असावा. शिवाय मुख्य कार्यालयाचे पत्र क्र. सापवि/मावक/२६६०,दिनांक ८-१०-२००३ अन्वये पाठविलेल्या प्रपत्रात ३०-९-२००४ अखेर शिल्लक असलेल्या अनुशेषाचे वेतनगट निहाय विश्लेषणाची माहितीसुद्धा न चुकता पाठवावी.

उपरोक्त शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

सोबत : १) शासन परिपत्रक
२) प्रपत्र- `अ` व प्रपत्र `ब`.

(सही) २३.११.१२...
संचालक (कर्मचारीवर्ग)

प्रेषण यादीप्रमाणे- कार्यकारी अभियंत्याच्या स्तरापर्यंत.

**परिमंडळ**

# प्रपत्र 'अ'

## विशेष भरती मोहिमेंतर्गत ३०-६-२००४ अखेर भरुन काढलेल्या अनुशेषाची माहिती

**सरळसेवा**

वेतनगट

| अ.क्र | कार्यालय निहाय पदनाम | विशेष भरती मोहिमेंतर्गत भरावयाचा अनुशेष | | | | | | | | | दिनांक १-१-२००३ ते ३०-९-२००४ अखेर भरलेला अनुशेष | | | | | | | | | शिल्लक अनुशेष | | | | | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु. जाती | अनु. जमाती | विज 'अ' | भज 'ब' | भज 'क' | भज 'ड' | विमाप्र | इमाव | एकूण | अनु. जाती | अनु. जमाती | विज 'अ' | भज 'ब' | भज 'क' | भज 'ड' | विमाप्र | इमाव | एकूण | अनु. जाती | अनु. जमाती | विज 'अ' | भज 'ब' | भज 'क' | भज 'ड' | विमाप्र | इमाव | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० |
| | कार्यालयाचे नाव | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | कार्यालयाचे नाव | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | गोषवारा | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

टीप : १. मुख्य कार्यालयातील सामान्य शाखांनी वेतनगट १, २, ३ व ४ ची माहिती क्षेत्रीय कार्यालयांनी वेतनगट ३ व ४ ची माहिती स्वतंत्र प्रवर्गात भरून द्यावी.

२. सरळसेवा व पदोन्नतीसाठी वेगवेगळी स्वतंत्र प्रपत्रे भरून द्यावीत.

## प्रपत्र 'ब'

## विशेष भरती मोहिमेंतर्गत ३०-९-२००४ अखेर भरून काढलेल्या अनुशेषाची माहिती

**परिमंडळ** — **पदोन्नती** — **वेतनगट**

| अ.क्र | कार्यालय निहाय पदनाम | विशेष भरती मोहिमेंतर्गत भरावयाचा अनुशेष | | | | | | | | | दिनांक १-१-२००३ ते ३०-९-२००४ अखेर भरलेला अनुशेष | | | | | | | | | शिल्लक अनुशेष | | | | | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु. जाती | अनु. जमाती | विज 'अ' | भज 'ब' | भज 'क' | भज 'ड' | विमाप्र | इमाव | एकूण | अनु. जाती | अनु. जमाती | विज 'अ' | भज 'ब' | भज 'क' | भज 'ड' | विमाप्र | इमाव | एकूण | अनु. जाती | अनु. जमाती | विज 'अ' | भज 'ब' | भज 'क' | भज 'ड' | विमाप्र | इमाव | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० |
| | कार्यालयाचे नाव | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | कार्यालयाचे नाव | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | गोषवारा | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

टीप : १. मुख्य कार्यालयातील साप्रवि शाखांनी वेतनगट १, २, ३ व ४ ची माहिती क्षेत्रीय कार्यालयांनी वेतनगट ३ व ४ ची माहिती स्वतंत्र प्रवर्गात भरून द्यावी.

२. सरळसेवा व पदोन्नतीसाठी वेगवगळी स्वतंत्र प्रपत्रे भरून द्यावीत.

क्र. साप्रवि/माक्क/४/
महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई- ४०००१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ४४२, दिनांक १७-११-२००४

विषय : अनुसूचित जमातीच्या राखीव जागावर सरळ सेवा/पदोन्नती झालेल्या बिगर आदिवासी अधिकारी/कर्मचा-यांना शासकीय/ निमशासकीय सेवेत संरक्षण देणेबाबत.

संदर्भ : १) प्रशासकीय परिपत्रक क्र.१५८, दि.१-११-१९९५
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.४०८, दि.१७-१-२००४

``अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर दिनांक १५ जून १९९५ पूर्वी, अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त झालेल्या, पदोन्नती मिळविलेल्या, शासकीय/निमशासकीय सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांना संरक्षण देण्याच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९८/१६-ब, दिनांक २७ मे २००२ अधिक्रमित करुन शासनाने शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२००२/प्र.क्र.९३/०४/१६-ब, दिनांक ३० जून २००४ अनुसार खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित केले आहेत.

(अ) ज्या बिगर आदिवासींनी अनुसूचित जमातीच्या राखीव जागावर दि.१५ जून १९९५ च्या पूर्वी शासकीय किंवा निमशासकीय सेवेत नोकरी किंवा पदोन्नती मिळविलेल्या आहेत, त्यांना सेवेतून काढण्यात येवू नये किंवा पदावनत करु नये. त्यांना ते ज्या घटकाचे आहेत, त्या घटकात दाखविण्यात यावे, यापुढे त्यांना त्या त्या घटकाचे आरक्षणाचे फायदे देय राहतील. अशाप्रकारे रिक्त झालेली पदे आदिवासी जमातीमधून भरण्यात यावीत.

(ब) वरील संरक्षण हे दिनांक १५ जून १९९५ च्या पूर्वी लागलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनाच देय राहील.

(क) वरीलप्रमाणे संरक्षित केलेल्या बिगर आदिवासी अधिकारी/कर्मचारी यांची सेवा ज्येष्ठता दिनांक १५ जून १९९५ अशी विचारांत घेण्यात यावी.

मंडळ ठराव क्रमांक १४८६, दिनांक १८-६-१९८५ (वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियमाच्या सुधारपत्र क्रमांक १७२, दिनांक २३-७-१९८५) व प्रशासकीय परिपत्रक क्रमांक २८९, दिनांक २०-१०-१९९८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार मा. सचिव यांनी मा. लेखा सदस्य, मा. तांत्रिक सदस्य यांच्याशी विचारविनिमय करून उपरोक्त शासन निर्णय स्वीकृत करण्यास मंजुरी दिली आहे.

तरी सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांनी उपरोक्त शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही विनाविलंब करावी असे मा. सचिव यांनी आदेश दिलेले आहेत. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.

सोबत : शासन निर्णय दि. ३०-६-२००४ ची प्रत.

संचालक (कार्मिक)

प्रति,

कार्यकारी अभियंता यांचे स्तरापर्यंत प्रेषण यादीनुसार.

C:\My Documents\Circular 1.doc

अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर सरळसेवा/पदोन्नती झालेल्या बिगर आदिवासी अधिकारी/कर्मचा-यांना शासकीय / निमशासकीय सेवेत संरक्षण देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक - बीसीसी २००२/प्र.क्र.९३/०४/१६ ब
मंत्रालय, मुंबई -३२
दिनांक : ३० जून २००४.

संदर्भ :- १) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग- बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक ८ डिसेंबर १९९४
२) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग- बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक २ जानेवारी १९९५
३) शासन निर्णय , समाज कल्याण , सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्रमांक सीबीसी १४९४/प्र.क्र.२३६/मावक -५, दिनांक ७ डिसेंबर १९९४.
४) शासन निर्णय, समाज कल्याण , सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्रमांक सीबीसी १४९४/प्र.क्र.२३६/मावक -५, दिनांक १३ जून १९९५.
५) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग- बीसीसी . ९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून १९९५
६) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग- बीसीसी १०९४/प्र.क्र. ८/९४/१६-ब, दिनांक २७ मे २००२.

**शासन निर्णय :-**

अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर दिनांक १५ जून १९९५ पूर्वी, अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त झालेल्या, पदोन्नती मिळविलेल्या, शासकीय / निमशासकीय सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांना संरक्षण देण्याच्या अनुषंगाने, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९८/१६-ब, दिनांक २७ मे २००२ अधिक्रमित करुन शासन खालील प्रमाणे सुधारीत आदेश देत आहे .

(अ) ज्या बिगर आदिवासींनी अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दिनांक १५ जून १९९५ च्या पूर्वी शासकीय किंवा निमशासकीय सेवेत नोकरी किंवा पदोन्नती मिळविलेल्या आहेत, त्यांना सेवेतून काढण्यात येवू नये किंवा पदावनत करु नये. त्यांना ते ज्या घटकाचे आहेत, त्या घटकात दाखविण्यात यावे, यापुढे त्यांना त्या त्या घटकाचे आरक्षणाचे फायदे देय राहतील. अशा प्रकारे रिक्त झालेली पदे आदिवासी जमातीमधून भरण्यात यावीत.

**(ब) वरील संरक्षण हे दिनांक १५ जून १९९५ च्यापूर्वी लागलेल्या अधिकारी /कर्मचारी यांनाच देय राहिल.**

**(क) वरीलप्रमाणे संरक्षित केलेल्या बिगर आदिवासी अधिकारी/ कर्मचारी यांची सेवाज्येष्ठता दिनांक १५ जून १९९५ अशी विचारात घेण्यात यावी.**

२. हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवेतील अधिकारी/ कर्मचारी तसेच मंडळे/ महामंडळे,नगरपालिका / महानगरपालिका , शासकीय उपक्रम , अनुदानित संस्था, विद्यापिठे , सहकारी संस्था, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादींनाही लागू राहील.

३. वरील आदेश मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख यांच्या तात्काळ निदर्शनास आणण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(यु.पी.एस. मदान)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव /अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव , मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक. उच्च न्यायालय , मूळ शाखा , मुंबई,
* प्रबंधक , उच्च न्यायालय , अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक , लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,
* सचिव , महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* आयुक्त, अनुसूचित जाती जमाती , भारत सरकार , पाचवा माळा, लोकनायक भवन , नवीदिल्ली
* संचालक, अनुसूचित जाती जमाती आयोग , भारत सरकार , चिपळूणकर भवन, शास्त्री मार्ग नवीपेठ, पुणे . ४११०३०.
* विशेष आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन , कोपर्निकस मार्ग, नवीदिल्ली -११०००१
संचालक, समाज कल्याण, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास , नाशिक
आयुक्त , आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
संचालक,रोजगार व स्वयंरोजगार विभाग , मुंबई ,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष ) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

क्र.साप्रवि/मावक/आरक्षण/पदोन्नती/फा.क्र.१०२
महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई- ४०००१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ४४३, दिनांक ३-१-२००५

विषय : पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर लागू करण्याबाबत.

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २५ मे, २००४.
२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २६ ऑक्टोब, २००४.

------------

महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय क्र. बीसीसी- २००१/१८८७/प्र. क्र. ६४/०१/१६-ब, दिनांक २५ मे २००४ नुसार शासन सेवेत असलेल्या मागासवर्गीय अधिकारी यांना पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर लागू केलेले आहे.

तसेच शासनाने, शासन निर्णय क्र. बीसीसी- २००१/१८८७/प्र. क्र. ६४/०१/१६-ब, दिनांक २६ ऑक्टोबर २००४ अन्वये आरक्षणाची पदे पदोन्नतीने भरण्यासंदर्भातील कार्यपद्धती विहित केलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयास अनुसरून महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाच्या विविध विनियमामध्ये आवश्यक त्या सुधारणा करून स्वतंत्रपणे यथा योग्य वेळी प्रसारित करण्यात येतील.

दरम्यान, मंडळ ठराव क्रमांक १४८६, दिनांक १८-६-१९८५ ( वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियमाच्या सुधारपत्र क्रमांक १७९, दिनांक २३-७-१९८५ ) व प्रशासकीय परिपत्राक क्रमांक २८९, दिनांक २०-१०-१९९८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार मा. सचिव यांनी मा. लेखा सदस्य, मा. तांत्रिक सदस्य यांच्याशी विचारविनिमय करून उपरोक्त शासन निर्णय स्वीकृत करण्यास मंजुरी दिली आहे.

सर्व नियुक्ती अधिका-यांनी उपरोक्त शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. उचित कार्यवाहीस्तव व अनुपालनार्थ सोबत उपरोक्त शासन निर्णयाच्या प्रती जोडल्या आहेत.

सोबत : १) शासन निर्णय क्र. बीसीसी-२००१/१८८७/
प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २५ मे, २००४
२) शासन निर्णय क्र. बीसीसी-२००१/१८८७/
प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २६ ऑक्टोबर, २००४.

संचालक (कर्मचारीवर्ग)

प्रति,

१) अपर संचालक (कर्मचारीवर्ग),मुख्य कार्यालय,मुंबई
यांना विनियमामध्ये आवश्यक त्या सुधारणांचा प्रस्ताव मंडळाकडे सादर करण्याच्या कार्यवाहीसाठी.

२) प्रेषण यादीप्रमाणे कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.

**पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर लागू करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
**दिनांक : २५ मे, २००४**

<u>पहा</u> :- १) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी १०७२/जे,दिनांक २३ मे १९७४
२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०७४ /डी , दिनांक २८ जानेवारी १९७५.
३)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०८९/२५५१ (अ) / १६ब, दिनाक २३ जानेवारी १९९१.
४)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमाक - बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६ब, दिनांक १८ ऑक्टो. १९९७.

**<u>प्रस्तावना</u> :-** मागासवर्गीय अधिकारी /कर्मचारी यांना पदोन्नतीमध्ये शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी १०७२/जे, दिनांक २३ मे १९७४ अन्वये आरक्षणाचे तत्व लागू करण्यात आले होते. तसेच शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०७४/डी , दिनांक २८ जानेवारी १९७५ अन्वये कनिष्ठ स्तरावरुन वरीष्ठ स्तरावर पदोन्नती देताना पाळावयाची तत्वे विशद केलेली असून या शासन निर्णयान्वये वर्ग १ च्या पहिल्या पदापर्यंतची (पहिल्या टप्प्यापर्यंत ) पदोन्नती, ही " योग्यतेनुसार वरिष्ठता " ( seniority subject to fitness) या तत्वावर मागासवर्गीयाकरीता असलेले आरक्षण विचारात घेवून करण्याबाबत आदेश होते. या शासन निर्णयानुसार वर्ग-१ च्या पहिल्या पदानंतरची (पहिल्या टप्प्यानंतरची ) पदोन्नती "काटेकोर निवड" पध्दतीद्वारे (By strict selection ) करण्याबाबत आदेश दिलेले असून, त्यानुसार वर्ग १ च्या पहिल्या पदानंतरच्या पुढील पदांना / टप्प्यांना आरक्षणाचे तत्व लागू केलेले नव्हते. याशिवाय शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी १०८९/२५५१ (अ) /१६ ब ,दिनांक २३ जानेवारी १९९१ अन्वये ज्या सेवा / संवर्गा मध्ये सरळसेवा भरतीचे प्रमाण ७५ % पेक्षा अधिक नाही, अशा सेवा /संवर्गामधून पदोन्नतीसाठी आरक्षण विहीत करण्याबाबत आदेश दिलेले होते. म्हणजेच ज्या सेवा/ संवर्गामध्ये सरळ सेवाभरतीचे प्रमाण ७५ % पेक्षा अधिक होते अशा वर्ग ४ ते वर्ग १ च्या पहिल्या टप्प्यापर्यंतच्या पदांमध्ये पदोन्नती करीता आरक्षण लागू नव्हते.

—

२. सद्य:स्थितीत महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २९/१/२००४ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेनुसार सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ मधील (आरक्षण कायदा) कलम ५ मध्ये खालील प्रमाणे तरतूदी केलेल्या आहेत.

**(अ) कलम ५ पोटकलम (१) पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर असेल.**

**(ब) पोटकलम (२) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास, पदोन्नतीद्वारे भरावयाच्या कोणत्याही पदासाठी आरक्षणाची तरतूद करणारे शासनाचे आदेश अंमलात असल्यास, शासनाकडून त्यामध्ये फेरफार करण्यात आला नसेल किंवा ते रद्द करण्यात आले नसतील तर ते अंमलात असल्याचे चालू राहतील.**

३. सध्या प्रचलित असलेल्या दिनांक २३ मे १९७४, २८ जानेवारी १९७५ व २३ जानेवारी १९९१ चे शासन निर्णय अधिक्रमित करुन आता नव्याने लागू केलेल्या वरील अधिनियमाच्या कलम ५ पोटकलम (१) व (२) च्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

## शासन निर्णय :-

(अ) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ मधील (आरक्षण कायदा) च्या कलम ५ मधील पोटकलम (१) नुसार जेथे पदे पदोन्नतीने भरली जातात तेथे आरक्षणाचे तत्व लागू होईल. त्यानुसार दिनांक २३/१/१९९१ च्या शासन निर्णयातील तरतूद रद्द करुन सरळ सेवेचे प्रमाण ७५ % पेक्षा अधिक असले तरीही उर्वरीत पदोन्नतीच्या पदांना आरक्षण लागू राहील.

(ब) पदोन्नतीमधील आरक्षण हे खालीलप्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| १)अनुसूचीत जाती | १३ % |
| २)अनुसूचीत जमाती | ७ % |
| ३)विमुक्त जाती (अ) | ३ % |
| ४)भटक्या जमाती (ब) | २.५% |
| ५)भटक्या जमाती (क) | ३.५% |
| ६)भटक्या जमाती (ड) | २ % |
| ७)विशेष मागास प्रवर्ग | २ % |
| एकूण | ३३ % |

**(क) जेथे पदोन्नतीकरीता सेवा प्रवेश नियमात तरतूद आहे तेथे पदोन्नती करीता अद्यापपर्यंत ज्या टप्प्यांना वा संवर्गांना आरक्षण लागू नव्हते, आता त्या पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांना / संवर्गांना आरक्षणाचे तत्व दिनांक २९/१/२००४ पासून लागू होईल.**

(ड) जे मागासवर्गीय अधिकारी वर्ग १ च्या वरील टप्प्यात दिनांक २९/१/२००४ या तारखेपर्यंत पदोन्नत झालेले आहेत ते सर्व सेवाजेष्ठता व गुणवत्तेनुसार झाले आहेत असे समजण्यात यावे .

(इ) या अधिनियमातील तरतुदीनुसार पदोन्नतीने भरण्यात येणारी आरक्षणाची पदे यापुढे रिक्त होणा-या पदांच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने भरण्यात यावीत.

(फ) नव्याने आरक्षण लागू केलेल्या संवर्गांना / पदांना सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक: बीसीसी -१०९७/प्र.क्र. ६३/९७/१६-ब , दिनांक १८/१०/१९९७ च्या शासन निर्णयातील आरक्षणा संबंधीचे आदेश लागू राहतील. मात्र ज्या संवर्गात नव्याने आरक्षण लागू करण्यात येणार आहे त्या संवर्गातील मंजूर पदांवर एकाच वेळी आरक्षण न लावता त्या संवर्गातील दिनाक २९/१/२००४ पासून रिक्त होणा-या पदांवरील टक्केवारी विचारात घेवून आरक्षणाची पदे विचारात घ्यावीत.

(ग) दिनांक २९/१/२००४ पूर्वी सुरु केलेल्या निवड प्रक्रियेमध्ये वर्ग १ च्या पुढील टप्यामध्ये तसेच ज्या पदोन्नतीच्या टप्प्यांना आरक्षण लागू नव्हते अशा पदोन्नतीच्या टप्प्यांमध्ये सदर अधिनियमाच्या तरतूदी लागू होणार नाहीत. मात्र दिनांक २९/१/२००४ च्या नंतरच्या निवड प्रक्रियेमध्ये अधिनियमातील तरतूदीनुसार आरक्षणाचे तत्व लागू राहिल.

४. वरील आदेश मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख याच्या निदेर्शनास आणून वरील आदेशांची योग्य अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल याच्या आदेशानुसार व नावाने,

( यु.पी.एस मदान )
सचिव

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव /अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव , सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय , मूळ शाखा , मुंबई,
* प्रबंधक , उच्च न्यायालय , अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक , लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,
* सचिव , महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* आयुक्त, अनुसूचित जाती जमाती , भारत सरकार , पाचवा माळा, लोकनायक भवन , नवीदिल्ली
* उप संचालक, अनुसूचित जाती जमाती आयोग , भारत सरकार , चिपळणूकर भवन, शात्री मार्ग नवीपेठ, पुणे , ४११०३०.
* विशेष आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन , कोपर्निकस मार्ग, नवीदिल्ली ११०००१
संचालक, समाज कल्याण, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास , नाशिक
आयुक्त , आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
संचालक,रोजगार व स्वंयरोजगार विभाग , मुंबई ,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष ) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती,
* पत्राने

आरक्षणाची पदे पदोन्नतीने भरण्यासंदर्भातील विहीत कार्यपध्दती....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र. ६४/०१ /१६ ब
मंत्रालय मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ ऑक्टोबर, २००४.

**पहा** :- १) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -१०७२/जे, दिनांक २३ मे १९७४

२) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः एसआरव्ही - १०७४ /डी , दिनांक -२८ जानेवारी १९७५.

३) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -१०८९/२५५१/ १६-ब, दिनाक- २३ जानेवारी १९९१.

४)शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग. क्रमांक : बीसीसी -१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दिनांक -१८ ऑक्टोबर १९९७.

५) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ ब, दिनांक २५ मे २००४

**शासन निर्णय :** -

महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती , निरधीसूचित जमाती (विमुक्त जाती ) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण ) अधिनियमाला अनुसरुन दिनांक २५ मे २००४ रोजी शासन निर्णय काढण्यात आला आहे. ज्या पदोन्नतीच्या पदांना प्रथमच आरक्षण लागू करण्यात आले आहे असे रिक्त पदे भरण्याचे तत्व उक्त शासन निर्णयात स्पष्ट केले आहे ही पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यपध्दती निश्चित कशी असावी याबाबत विभागांकडून काही शंका उपस्थित करण्यात येत आहेत आणि त्यांचे स्पष्टीकरण या विभागाकडे विचारण्यात येत आहे. त्या अनुषंगाने शंका निरसनासाठी सर्व टप्प्यांवर पदोन्नतीची रिक्त पदे राखीव प्रवर्गामधून भरण्याची सविस्तर कार्यपध्दती पुढील प्रमाणे राहील.

१) पदोन्नतीकरीता निवडसूची ही प्रत्येक सेवाभरती वर्षामध्ये (१ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट ) तयार करावी. नेहमीची प्रथा अशी आहे की, विशिष्ट संवर्गात ज्यावेळी एखादे रिक्त पद किंवा रिक्त पदे निर्माण होतात त्यावेळी पदोन्नतीकरीता निवडावयाच्या उमेदवारांचे प्रस्ताव सादर करण्यात येतात. ही चुकीची पध्दत आहे भरती वर्षात एकूण किती रिक्त पदे उपलब्ध होऊ शकतील अशा संभाव्य रिक्त पदांच्या संख्येचा अचूक अंदाज काढावा व त्या वर्षातील अशा रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन दरवर्षी निवडसूची तयार केली गेली पाहिजे. एखादया सेवा भरती वर्षात रिक्त असलेल्या व रिक्त होणा-या संभाव्य पदांचा अचूक अंदाज केल्यानंतर अशा रिक्त पदांवर ३३ टक्के आरक्षणाचे सूत्र लागू करुन आरक्षित करावयाच्या पदांची संख्या काढणे ही त्यापुढची पायरी आहे. राखीव पदांची संख्या अपूर्णांकात असेल तर ती जवळच्या पूर्ण संख्येत पूर्णांकात करण्यात येईल, जसे आरक्षणासाठी २.३ पदे असतील तर ती २ म्हणून समजण्यात येतील आणि २.६ पदे असतील तर ती ३ म्हणून समजण्यात येतील . २.५ हा आकडा या प्रयोजनासाठी २ म्हणून नव्हे तर ३ म्हणून समजण्यात येईल.

२) राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी उपलब्ध पदांची संख्या निश्चित केल्यावर कोणत्या विशिष्ट
प्रवर्गासाठी ती पदे वापरता येतील ते ठरविण्यात यावे. या प्रयोजनार्थ दिनांक १८/१०/१९९७ च्या
शासन निर्णया सोबतच्या पदोन्नतीसाठीच्या नमुनावजा १०० बिंदू नामावलीचे सहाय्य घेण्यात यावे.
पहिल्या भरती वर्षात अशा उपलब्ध पदांसाठी नामावलीतील बिंदू हे प्रत्येक राखीव प्रवर्गाकरिता ते
नामावलीमध्ये ज्या क्रमाने असतील त्याच क्रमाने अनुक्रमांक १ पासून सुरु होऊन वापरण्यात येतील.
उदा.जर केवळ एकच राखीव पद उपलब्ध झाले तर ते पद अनुसूचित जातीच्या उमेदवारामधून
भरण्यात यावे. कारण बिंदू नामावलीतील पहिला अनुक्रमांक हा अनुसूचित जातीसाठी आहे. जर दोन
राखीव पदे असतील तर त्यापैकी एक अनुसूचित जातीच्या उमेदवाराला तर दुसरे अनुसूचित जमातीच्या
उमेदवाराला मिळेल, कारण बिंदूनामावलीतील अनुक्रमांक १ व २ वरील राखीव बिंदू या प्रवर्गासाठी
आहे. तीन राखीव पदे असतील तर पहिले पद अनुसूचित जातीच्या, दुसरे पद अनुसूचित जमातीच्या व
तिसरे पद विमुक्त जाती (अ) च्या प्रवर्गाच्या जातीच्या उमेदवाराला मिळेल. कारण अनुक्रमांक १, २
व ३ वरील राखीव बिंदू अनुक्रमे या प्रवर्गासाठी आहेत. याच पध्दतीने बिंदू नामावलीमध्ये दिलेल्या
क्रमाने प्रत्येक राखीव प्रवर्गासाठीचा नामावली बिंदू वापरण्यात यावा.

३) पुढील भरती वर्षामध्ये विशिष्ट वर्षात रिक्त होणाऱ्या आरक्षित पदांसाठी वापरावयाचा नामावली
बिंदू हा मागील वर्षात वापरलेल्या शेवटच्या मागासवर्गीयांच्या नामावली बिंदू पासून पुढे सुरु होईल.
स्पष्टीकरणार्थ- पहिल्या वर्षात जर एक रिक्त पद राखीव असेल व ते नामावली बिंदू क्रमांक १ वरील
अनुसूचित जातीच्या उमेदवाराकडे गेले असेल आणि दुसऱ्या वर्षात पुन्हा एक रिक्त पद राखीव असेल
तर ते अनुसूचित जातीच्या पुढे येणाऱ्या बिंदू नामावलीतील क्र.२ नुसार अनुसूचित जमातीच्या
उमेदवाराकडे जाईल. त्याप्रमाणे पहिल्या वर्षी ३ रिक्त पदे राखीव असतील व ती पदे (बिंदू नामावली
क्र.१,२ व ३ नुसार अनुक्रमे) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती (अ) या प्रवर्गातील
उमेदवाराकडे गेली असतील आणि जर पुढील वर्षात राखीव प्रवर्गासाठी आणखी ३ पदे उपलब्ध होणार
असतील तर ही तीन पदे राखीव प्रवर्गात पुढे येणाऱ्या नामावली बिंदूनुसार म्हणजेच अनु.क्र.४ वरील
भटक्या जमाती (क) अनु.क्र.७ वरील भटक्या जमाती (ब) आणि अनु.क्र.११ वरील भटक्या जमाती
(ड) यांच्याकडे जातील. अशारीतीने प्रत्येक संवर्गातील पुरेसे प्रतिनिधीत्व प्राप्त करण्याची सर्व राखीव
प्रवर्गांना संधी मिळेल.

४) तथापि संवर्गात एकूण कर्मचारीसंख्या ३२ पेक्षा कमी असेल अशा संवर्गाकरिता ही स्थिती कधीही
साध्य करता येणार नाही. कारण ३३ टक्क्यांची मर्यादा राखतांना विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती
(ब, क आणि ड) आणि विशेष मागास प्रवर्ग यांतील उमेदवारांना त्यांच्या प्रमाणशीर आरक्षणाच्या
दृष्टीने प्रत्येकी एक पद सुध्दा मिळणार नाही. म्हणून अशा प्रकरणांमध्ये राखीव प्रवर्गासाठी नंतरच्या बिंदू
नामावली बिंदू क्रमाचा अवलंब करण्याची पध्दत पुढे चालू ठेवण्यात यावी.

५) पदांची एकूण संख्या ही ३२ किंवा त्याहून अधिक असेल अशा संवर्गासाठी वर स्पष्ट केल्याप्रमाणे,
बिंदू नामावली पध्दतीचा वापर करतेवेळी नेहमीच प्रत्येक प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदांची एकूण
संख्या लक्षात घ्यावी. उदा. एखाद्या संवर्गाची संख्या ४० असल्यास वैयक्तिक व एकत्रितपणे ३३
% आरक्षण ठेवता येण्यासाठी त्यापैकी ५ अनुसूचित जाती, ३ अनुसूचित जमाती, ४ विमुक्त जाती
आणि भटक्या जमाती ( अ, ब , क, ड यांसाठी प्रत्येकी १ पद) आणि १ विशेष मागास वर्गीय
उमेदवार याप्रमाणे पदे घ्यावी लागतील. बिंदू नामावलीतील बिंदूचा अवलंब करताना , काही झाले
तरी , ५,३,४ व १ ही मर्यादा ओलांडली गेलेली नाही याची खातरजमा करावी. एखाद्या विशिष्ट वेळी
अनुसूचित जातीचे ५ उमेदवार अगोदरच पदावर असतील आणि राखीव प्रवर्गासाठी नवीन रिक्त पद

H-725-1अ

निर्माण झाल्यास व बिंदूनामावलीतील त्यापुढील बिंदू हा पुन्हाअनुसूचित जातीचा असल्यास , त्या प्रवर्गाला अगोदरच १३ % इतके पुरेसे प्रतिनिधीत्व असल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करावे. अशा प्रकरणांच्या बाबतीत राखीव प्रवर्गासाठी बिंदू नामावलीतील त्यानंतरचा नामावली बिंदू वापरण्यात यावा. समजा ज्या प्रवर्गासाठी बिंदू नामावलीतील नंतरचा नामावली बिंदू वापरावयाचा असेल त्या प्रवर्गाला देखील या अगोदरच विहीत टक्केवारी प्रमाणे आरक्षण मिळाले असल्यास त्यानंतरच्या आरक्षणासाठीचा नामावली बिंदू वापरण्यात यावा. जेणेकरुन प्रत्येक राखीव प्रवर्गाला पुरेसे प्रतिनिधीत्व मिळू शकेल . मात्र ज्यावेळी विहित टक्केवारीनुसार / बिंदूनामावली नुसार आरक्षित पदे उपलब्ध नसतील व मागासवर्गीय त्यांच्या ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीस उपलब्ध असला तर त्यांना केवळ आरक्षित पद / बिंदू उपलब्ध नाही म्हणून पदोन्नती नाकारण्यात येवू नये, त्यांना त्यांच्या ज्येष्ठतेनुसार बिनराखीव पदावर पदोन्नती देण्यात यावी.

६ ) हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी पदोन्नती देण्यासाठी ज्या संवर्गामध्ये आरक्षणाची पध्दत लागू करण्यात येत होती अशा संवर्गासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १८/१०/१९९७ रोजीच्या शासन निर्णयामधील याबाबतीत नमूद केलेली पध्दती अनुसरण्यात येईल . त्याचप्रमाणे शासन निर्णय दिनांक २३/५/१९७४ व २८/१/१९७५ यामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट दिनांक २५ मे २००४ चा शासन निर्णय किंवा हे परिपत्रक यांच्याशी विसंगत नसेल तर ती अंमलात असणे तसेच चालू राहील.

